मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




उपसंपादक - श्री विलास गायकवाड • कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे • निवासी संपादक - श्री राकेश पाटील • सह संपादक - श्री मुकुंद कांबळे • महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे • कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

वर्ष : ३ | अंक : २९० | शुक्रवार, ०३ जुलै २०२६ | किंमत : २ रु | पृष्ठ : ४ | RNI MAHMAR/2023/89514

# माहिती अधिकार कायद्यातील वादग्रस्त बदलांना स्थगिती

**मुंबई :** राज्य माहिती अधिकार कायद्यात करण्यात आलेल्या वादग्रस्त बदलांना अखेर राज्य सरकारने स्थगिती दिली आहे. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी या बदलांविरोधात आंदोलनाची भूमिका घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः पुढाकार घेत हस्तक्षेप केला. मुख्यमंत्र्यांनी राज्य माहिती आयोगाला पत्र पाठवून अण्णा हजारे यांच्याशी चर्चा होईपर्यंत कोणताही अंतिम निर्णय घेऊ नये, अशी विनंती केली होती. त्यानंतर राज्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांनी या पत्राची दखल घेत १२ जून रोजी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेल्या सर्व वादग्रस्त बदलांना स्थगिती देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे अण्णा हजारे यांनी जाहीर केलेल्या आंदोलनाला यश मिळाल्याचे मानले जात आहे. यापूर्वी राहुल पांडे यांनी राळेगणसिद्धी येथे जाऊन अण्णा हजारे यांची भेट घेत चर्चा केली होती. मात्र, समाधानकारक तोडगा निघत नसल्याने अण्णा हजारे यांनी उपोषणाचा निर्णय कायम ठेवला होता. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हस्तक्षेप करत माहिती आयोगाला पत्र पाठवले आणि अण्णा हजारे यांच्याशी चर्चा झाल्याशिवाय



पुढील निर्णय घेणे योग्य ठरणार नाही, असे स्पष्ट केले. या पत्रानंतर मुख्य माहिती आयुक्तांनी वादग्रस्त बदलांना स्थगिती देण्याची घोषणा केली. दरम्यान, अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात

## अण्णा हजारेंच्या आंदोलनाला यश !

माहिती अधिकार कायद्याची परिणामकारकता कमी करणाऱ्या प्रस्तावित दुरुस्त्या तातडीने मागे घेण्याची मागणी केली होती. तसे न झाल्यास ५ जुलै २०२६ पासून राळेगणसिद्धी येथे बेमुदत उपोषण सुरू करण्याचा इशाराही त्यांनी दिला होता. माहिती अधिकार कायदा हा सामान्य नागरिकांच्या हातातील भ्रष्टाचाराविरोधातील प्रभावी शस्त्र असून या कायद्याची धार बोथट करण्याचा कोणताही प्रयत्न लोकशाहीसाठी घातक ठरेल, असे त्यांनी पत्रात नमूद केले होते. प्रस्तावित बदलांमुळे माहिती आयोगाचे अधिकार कमी होण्याची शक्यता असून नागरिकांना माहिती मिळविण्याच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊ शकतात, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली होती. शासनातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्वावरही त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले. गेल्या दोन दशकांत माहिती अधिकार कायद्याच्या माध्यमातून अनेक भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आली असून सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी हा कायदा प्रभावी ठरला आहे. त्यामुळे या कायद्याचे मूळ स्वरूप कायम ठेवावे आणि जनहिताला बाधा आणणाऱ्या सर्व तरतुदी मागे घ्याव्यात, अशी मागणी अण्णा हजारे यांनी केली होती. सरकारने वादग्रस्त बदलांना स्थगिती दिल्यानंतर या प्रश्नावर व्यापक चर्चा करून पुढील निर्णय घेतला जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व– वाय.टी. देशमुख

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रेरणादायी व्यक्तिमत्व असल्याचे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख यांनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन आत्माराम भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व भारतीय जनता पार्टी उलवे नोड २ च्या संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदावरून बोलताना वाय.टी. देशमुख यांनी जिद्द, चिकाटी व परिश्रमाची कास धरून विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी व्हावे व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याप्रमाणे अपार कष्ट व मेहनत करून यशस्वी होऊन लोकहिताचा व दातृत्वाचा आदर्श घ्यावा असे आवाहन केले.श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्यावतीने दरवर्षी




विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वितरित केले जाते. त्यानुसार २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन आत्माराम भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप मंडळाच्या वतीने करण्यात आले. याप्रसंगी ज्येष्ठ नेते भाऊशेठ पाटील, पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, रायगड जिल्हा परिषदेच्या सदस्या निकिता खारकर, पनवेल पंचायत समितीचे सदस्य वितेश म्हात्रे, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य विश्वनाथ कोळी, संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, रतनशेठ भगत, माजी उपसरपंच विजयनाना घरत, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर, सुहास भगत, विनायक कोळी, सुदर्शन घरत, जयवंत देशमुख, भाऊ भोईर, सुभाष गोंधळी, प्रतिश पाटील, गणेश पाटील, धीरज ओवळेकर, निलेश खारकर, शैलेश भगत, किशोर पाटील, राजेश पाटील, चेतन पाटील, विराज देशमुख, अनिल कोळी, जयश्री घरत, उपमुख्याध्यापक विलासराव लेंगे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख संजय उगले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे औचित्यत्ताधून जनार्दन आत्माराम भगत ज्युनिअर कॉलेज स्थानिक शाळा समितीच्या सदस्य पदी निवड झाल्याबद्दल वाय.टी. देशमुख आणि विजय घरत यांचा तर विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीच्या सदस्यपदी पुनर्निवड झाल्याबद्दल विश्वनाथ कोळी व अनंताशेठ ठाकूर यांचा विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक रवींद्र भोईर यांची संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्यपदी निवड झाल्याबद्दल सन्मान करण्यात आला. तर मुख्याध्यापक संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त झाल्याबद्दल उपशिक्षिका दर्शना माळी यांचाही मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

# एनबीकेसी रायगडच्या खेळाडू व प्रशिक्षकांचा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते गौरव

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** एनबीकेसी रायगडच्या खेळाडू आणि प्रशिक्षकांनी राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावरील कराटे स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून रायगड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते खेळाडू व प्रशिक्षकांचा विशेष सत्कार करण्यात आला.न्यू बॉम्बे कराटे क्लब, रायगडच्या खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करत जिल्ह्याचे नाव उंचावले आहे. कराटेपटू फॉस्टिना फर्नांडो हिने राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत सुवर्णपदक पटकावत भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी दक्षिण आशिया कराटे आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड मिळवली आहे. तिच्या या यशामुळे क्रीडा क्षेत्रातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव



होत आहे. याच स्पर्धेत अनात्रा समीत करांडे हिने राज्यस्तरीय सुवर्णपदक विजेती म्हणून आपली कामगिरी कायम राखत राष्ट्रीय स्तरावर रौप्यपदक मिळवून उल्लेखनीय यश मिळवले आहे. या यशामागे प्रशिक्षक योगेश कांबळी आणि प्रशिक्षक बिपीन राय यांचे मार्गदर्शन व परिश्रम मोलाचे ठरले आहेत. खेळाडूंनी केलेल्या मेहनतीमुळे न्यू बॉम्बे कराटे क्लबला राष्ट्रीय स्तरावर विशेष ओळख मिळाली आहे. न्यू बॉम्बे कराटे क्लबचे अध्यक्ष रोहन यादव यांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे व प्रशिक्षकांचे अभिनंदन करत आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी सांगितले की, रायगड जिल्ह्यातील खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी मिळवून देण्यासाठी क्लब सातत्याने प्रयत्नशील आहे.






# साई ट्रस्ट जवाहरलाल नेहरू पोर्ट माध्यमिक विद्यालयात इयत्ता दहावीचा अभ्यासवर्ग व चित्रकला ग्रेड परीक्षा सराव सुरु

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** 1 जुलै 2026 रोजी उज्वल निकालाची परंपराराखत आलेल्या साईट ट्रस्ट जवाहरलाल नेहरू पोर्ट संचलित माध्यमिक विद्यालयात इयत्ता 10च्या अभ्यास वर्गाचे आणि चित्रकला ग्रेड परीक्षा अभ्यास वर्गाचे उद्घाटन साई ट्रस्टचे अध्यक्ष सन्माननीय श्री नरसू पाटील सर यांच्या शुभहस्ते करण्यात आले

यावेळी शाळेचे प्रशासकीय अधिकारीश्री.रमाकांत गावंड सर, माध्यमिक विभाग मराठी माध्यमाचे मुख्याध्यापक श्री. गिरीश पाटील सर,



इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक श्री. भूषण जाधव सर, इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक श्री अंकुश जोगळे सर,इयत्ता दहावीचे विषय शिक्षक आणि चित्रकला शिक्षक उपस्थित होते.

अभ्यास वर्ग सुरू झाल्यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये प्रचंड उत्साह आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सन्माननीय श्री. नरसू पाटील सर यांनी विद्यार्थ्यांना कठोर परिश्रमाशिवाय पर्याय नाही तसेच स्पर्धा स्वतःशी करा असे म्हटले. येथील गुणवत्तावान शिक्षक शालेय वेळेव्यतिरिक्त वेळेत आपणाला मार्गदर्शन करणार आहेत त्याचा जास्तीत जास्त लाभ आपण घ्यावा असे म्हटले. तर शाळेचे प्रशासकीय अधिकारी श्री रमाकांत गावंड सर यांनी विद्यार्थ्यांनी अधिकाधिक मेहनत घेऊन साई ट्रस्टचे नाव मोठं करावं अशी शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता दहावीचे वर्गशिक्षक श्री राजेंद्र ठाकूर सर यांनी केले. यावेळी श्री जगदीश गावंड सर, श्रीमती सरोज पाटील मॅडम, श्रीमती प्रमिला पवार मॅडम, श्रीमती सुरेखा पाटील मॅडम इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# धोकादायक व जीर्ण अवस्थेतील जुन्या इमारतीची तत्काळ पाहणी करून आवश्यक कारवाई करण्याची नईम अख्तर मन्सुरी यांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : पनवेल शहरातील विरूपाक्ष मंदिर जवळील मनिष मार्केट, श्री कलेक्शनच्या दुकानाच्या पाठीमागील बाजुस सुमारे १०० वर्षे जुनी चाळ बांधकाम असून त्याची अवस्था अत्यंत जीर्ण व धोकादायक झाली आहे. चाळ बांधकामाच्या जवळपास सर्व भिंतीना मोठमोठे तडे गेले असून ते घर कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता आहे. सध्या पावसाळा सुरू असल्यामुळे ही परिस्थिती अधिक गंभीर झाली असून नागरीकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. धोकादायक व जीर्ण अवस्थेतील जुन्या इमारतीची तत्काळ पाहणी करून आवश्यक कारवाई



करण्याची नईम अख्तर मन्सुरी यांनी पालिकेकडे मागणी केली आहे.


या ठिकाणी दररोज दुकानात येणा-या ग्राहकांची, स्थानिक नागरीकांची तसेच रस्त्याने ये-जा करणा-या नागरीकांची मोठया प्रमाणात वर्दळ असते. ते घर कोसळल्यास मोठी जीवीतहानी व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर धोकादायक घराची तत्काळ पाहणी करून संबंधीत मालकास आवश्यक त्या सुचना देण्यात याव्यात तसेच महानगरपलिकेच्या नियमांनुसार योग्य ती तातडीची कारवाई करण्यात यावी अशी मागणी नईम अख्तर मन्सुरी यांनी पनवेल महानगरपालिकेकडे पत्राद्वारे केली आहे.

# भारताचे पहिले खाजगी ऑर्बिटल रॉकेटचे 'मिशन आगमन' स्काय-रूटचे विक्रम-1 पहिल्यांदाच अवकाशात दाखल होणार

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी** : स्कायरूट एअरोस्पेसने आज आपल्या विक्रम-1 या प्रक्षेपण यानाच्या पहिल्या चाचणी उड्डाणासाठी प्रक्षेपण कालावधी (Launch Window) खुला झाल्याची घोषणा केली. विक्रम-1 हे भारतात खाजगी क्षेत्रातून विकसित करण्यात आलेले पहिले ऑर्बिटल-श्रेणीतील रॉकेट आहे. टेस्ट फ्लाइट-1चे प्रक्षेपण 12 जुलै नंतर कोणत्याही दिवशी होण्याचे नियोजन असून, हे एसडीएससी-शार, श्रीहरिकोटा येथील प्रक्षेपण स्थळी असेंब्ली आणि चाचणी प्रक्रिया पूर्ण होणे, तसेच हवामान, सुरक्षा आणि प्रक्षेपण क्षेत्राची अंतिम मंजुरी यांवर अवलंबून असेल. हा प्रक्षेपण कालावधी 4 ऑगस्टपर्यंत खुला राहणार आहे.

पवन कुमार चंदाना, सह-संस्थापक - मुख्य कार्यकारी अधिकारी, स्कायरूट एअरोस्पेस,"मिशन आगमनचे सर्वात महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे विक्रम-1मधील प्रत्येक प्रणालीच्या प्रत्यक्ष उड्डाणादरम्यानच्या कार्यक्षमतेविषयीचा महत्त्वपूर्ण डेटा



संकलित करणे. प्रक्षेपणापासून ते उड्डाणाच्या प्रत्येक टप्प्यापर्यंत हे यान कशा प्रकारे कार्य करते, हे आम्हाला समजून घ्यायचे आहे. हा डेटा केवळ जमिनीवरील चाचण्यांद्वारे पूर्णपणे मिळू शकत नाही. या डेटाच्या आधारे आम्ही आमच्या डिझाइनची पडताळणी करू आणि विश्वासार्ह, उच्च वारंवारतेचा व्यावसायिक प्रक्षेपण कार्यक्रम उभारण्यासाठी पुढील वाहन विकासाला दिशा देऊ. विक्रम-1चे उड्डाण होताच भारताचे खाजगी अवकाश उद्योगक्षेत्र यापूर्वी कधीही गाठले गेले नव्हते अशा एका ऐतिहासिक टप्प्यावर पोहोचेल."

नागा भरत डाका, सह-संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, स्कायरूट एअरोस्पेस म्हणाले,"भारतात प्रक्षेपण यान तयार करण्याच्या स्वप्नापासून ते आता ऑर्बिटल उड्डाणाचा प्रयत्न करण्यापर्यंतचा हा प्रवास अतुलनीय राहिला आहे. 2022मध्ये विक्रम-एसद्वारे आम्ही आमच्या तांत्रिक पायाभूत क्षमतेची यशस्वी पडताळणी केली. आता विक्रम-1च्या माध्यमातून भारतात विकसित करण्यात आलेले भारतासाठी आणि जगासाठी असलेल्या विश्वासार्ह व उच्च वारंवारतेचे प्रक्षेपण कार्यक्रमाच्या दिशेने आम्ही आतापर्यंतचे सर्वात मोठे पाऊल टाकत आहोत. ही मोहीम तंत्रज्ञान प्रात्यक्षिक आणि शिकण्याची संधी या दोन्ही उद्देशांनी आखण्यात आली आहे. भारत सरकार, इन-स्पेस, इस्रो, आमचे गुंतवणूकदार, आणि सहकाऱ्यांनी दाखवलेल्या विश्वासामुळेच हे शक्य झाले आहे."

विक्रम-1 हे सात मजली इमारती इतक्या उंचीचे, बहु-टप्पीय ऑर्बिटल प्रक्षेपण यान असून, ते पूर्णपणे कार्बन कॉम्पोझिट संरचनेत तयार करण्यात आले आहे. या यानात कंपनीने स्वतः विकसित केलेल्या प्रणोदन प्रणालींचा वापर करण्यात आला असून, त्यामध्ये 3D-प्रिंटेड इंजिन्स आणि उच्च-थ्रस्ट घन इंधन रॉकेट बूस्टर्सचाही समावेश आहे. लो-अर्थ ऑर्बिट मध्ये 350 किलो वजनापर्यंत छोटे उपग्रह प्रक्षेपित करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेल्या विक्रम-1च्या पहिल्या मोहिमेत 450 किमी उंचीवरील आणि 60-अंश ऑर्बिटल इन्क्लिनेशन असलेल्या कक्षेला लक्ष्य करण्यात येणार आहे.

# डॉ. अॅड. कौन्सेलर योगिता सावंत यांचा पुण्यात गौरव

**दैनिक युवक आधार**

**मुंबई किशोर गुडेकर, विभागयी संपादक** : समाजसेवा, महिला सक्षमीकरण, समुपदेशन आणि सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डॉ. अॅड. कौन्सेलर योगिता सावंत यांना प्रतिष्ठेचा 'लोकराजा राजश्री शाहू महाराज पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हा भव्य पुरस्कार वितरण सोहळा पुणे येथील पत्रकार भवन येथे मोठ्या उत्साहात आणि मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात विविध सामाजिक, शैक्षणिक आणि जनहिताचे कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला. यावेळी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते डॉ. योगिता सावंत यांना




सन्मानचिन्ह, मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

डॉ. योगिता सावंत यांनी समुपदेशनाच्या माध्यमातून अनेक कुटुंबांना योग्य मार्गदर्शन केले असून, महिला, युवक आणि गरजू नागरिकांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या सामाजिक बांधिलकीची दखल घेत हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ. योगिता सावंत यांनी हा सन्मान आपल्या कुटुंबीय, सहकारी आणि समाजहितासाठी कार्य करणाऱ्या सर्वांना समर्पित असल्याची भावना व्यक्त केली. "हा पुरस्कार माझ्यासाठी प्रेरणादायी असून, यापुढेही समाजाच्या हितासाठी अधिक जोमाने कार्य करण्याची ऊर्जा मिळाली आहे," असे त्यांनी मनोगतात सांगितले.

या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, पोलीस अधिकारी तसेच अनेक प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी डॉ. योगिता सावंत यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. लोकराजा राजश्री शाहू महाराज यांच्या समतेच्या, शिक्षणाच्या आणि समाजकल्याणाच्या विचारांचा वारसा पुढे नेणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या सोहळयामुळे समाजात सकारात्मक कार्य करणाऱ्या व्यक्तींना नवी प्रेरणा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# रोटरी क्लब ऑफ खारघर मिडटाऊनतर्फे डॉक्टर्स डे व सीए डे निमित्त मान्यवरांचा त्यांच्या कार्यस्थळी सन्मान

**दैनिक युवक आधार**

**खारघर, प्रतिनिधी** : राष्ट्रीय डॉक्टर्स डे आणि चार्टर्ड अकाउंटंट्स डे निमित्त रोटरी क्लब ऑफ खारघर मिडटाऊनच्या वतीने परिसरातील डॉक्टर व चार्टर्ड अकाउंटंट्स यांचा त्यांच्या दवाखान्यात, रुग्णालयात तसेच कार्यालयात प्रत्यक्ष भेट देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी रोटरी क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी डॉक्टर आणि सीए यांना प्रशस्तीपत्र (Appreciation Certificate) प्रदान करून त्यांच्या समाजहितासाठीच्या समर्पित व उल्लेखनीय कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

आरोग्यसेवेच्या माध्यमातून समाजाचे संरक्षण करणारे डॉक्टर आणि आर्थिक शिस्त, पारदर्शकता व प्रगतीसाठी मोलाचे योगदान देणारे चार्टर्ड अकाउंटंट्स हे समाजाचे महत्त्वाचे आधारस्तंभ असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

या उपक्रमामुळे सन्मानित व्यावसायिकांनी रोटरी क्लब ऑफ खारघर मिडटाऊनचे आभार मानत अशा प्रेरणादायी उपक्रमांचे स्वागत केले. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य



करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करून सामाजिक बांधिलकी जपण्याचा रोटरी क्लबचा हा उपक्रम सर्वांनी कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

# पावसाच्या पहिल्या सरीत खांदा कॉलनी परिसरात नेहमी प्रमाणे पाणी तुंबले

## गटारे नाले सफाई नीट झाले नाहीत

**दैनिक युवक आधार**

**खांदा कॉलनी प्रतिनिधी** : पावसाच्या पहिल्या सरीत खांदा कॉलनीत नेहमी प्रमाणे पाणी साचल्याने मुंबई पुणे हायवे प्रचंड पाणी साचल्याने परिसरात वाहतूक कोंडी झाली होती हे पाणी काढण्यासाठी पनवेल महापालिकेने नेहमी प्रमाणे विविध ठिकाणी पंप लावले आहेत पण त्याची देखभाल व्यवस्थित होत नसल्याने पंप नेहमी प्रमाणे नादुरुस्त अवस्थेत होते याबद्दल स्थानिक नगरसेविका सिताताई पाटील यांनी महापालिका प्रशासनाना बद्दल नाराजी व्यक्त केली पावसाळ्यात पंपाची व्यवस्थित देखभाल करावी प्रत्येक ठिकाणी माणसे नेमावीत अशी मागणी केली ठेकेदाराने व्यवस्थित गटारे नाले सफाई न केल्याने नेहमी खांदा कॉलनीत पाणी तुंबते प्रशासन कामांवर लक्ष ठेवत नसल्याने वरिल



गोष्टी दर वर्षी खांदा कॉलनीत होतात त्यामुळे पनवेल महापालिका प्रशासनाने पावसाळ्यात तरी आपल्या कामांवर नीट लक्ष ठेवावे अशी मागणी नगरसेविका सिताताई पाटील यांनी केली

# राष्ट्रीय डॉक्टर दिनाचे औचित्य साधून जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने ठाणे येथील तुषार नर्सिंग होम मधील डॉक्टर्स"कृतज्ञता प्रमाणपत्राने"सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**ठाणे प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर** : ऋग्णसेवा हीच ईश्वर सेवा'असे मानत रुग्णांच्या रात्रं दिवस तत्पर असणाऱ्या सर्व डॉक्टर बंधू भगिनींना१जुलै या राष्ट्रीय डॉक्टर दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!याच डॉक्टर दिनाचे औचित्य साधून जनजागृती सेवा संस्थेने घोडबंदर रोड, कापुरबावडी नाका, ठाणे पश्चिम येथील डॉ.संदीप कदम यांच्या तुषार नर्सिंग होम मधील बालरोग तज्ज्ञ, स्त्रीरोग तज्ज्ञ, अस्थिरोग तज्ज्ञ, पॅथॉलॉजिस्ट, जनरल व लॅप्रोस्कोपी सर्जन, फिजिशियन व डायबेटोलॉजिस्ट, फिजिओथेरापीस्ट, पीडियाट्रिक सर्जन, त्वचारोग तज्ज्ञ, प्लास्टिक सर्जन अशा वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्तीमत्वांना संस्थेच्या वतीने'कृतज्ञता प्रमाणपत्र'प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करुन सन्मानित करण्यात आले.याप्रसंगी विजय चव्हाण(कार्याध्यक्ष-ठाणे जिल्हा वृत्तपत्र लेखक संघ, विभागप्रमुख-उबाठा गट),आरती भार्ज(समुपदेशक, ध्यान प्रशिक्षक, लेखिका, व्याख्यात्या, सामाजिक संस्था व्यवस्थापक), छाया गचके(खजिनदार- महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघ), मानसी मोने(खजिनदार-सेवा समाधान फाऊंडेशन, समाजसेविका), मनमोहन रोगे(कवी, जेष्ठ वृत्तपत्र लेखक) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.डॉ.संदीप कदम यांनी आपल्या व्यस्त शेड्युल मध्ये सुद्धा आमच्या संस्थेचा उपक्रमाला बराच वेळ दिला. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी विशेष आभार मानले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे खजिनदार दत्ता कडुलकर यांचे विशेष सहकार्य लाभले.



# पद्मश्री अनुप जलोटा यांच्या हस्ते 'भक्ती का महासागर' ग्रंथाचे प्रकाशन

## विराग मधुमालती यांच्या ९ व्या विश्वविक्रमाचा गौरव

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी** : प्रख्यात गायक, कलाकार, लेखक, दिग्दर्शक, समाजसेवक आणि अनेक वर्ल्ड रेकॉर्डस धारक विराग मधुमालती यांच्या 'भक्ती का महासागर' या अद्वितीय ग्रंथाचे प्रकाशन आज शिकारा हॉटेल, सानपाडा येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. भगवान भैरवांवरील १,१०७ मौलिक भक्तिगीतांचा समावेश असलेल्या या ग्रंथाचे प्रकाशन भारताचे सुप्रसिद्ध भजनसम्राट पद्मश्री अनुप जलोटा व

श्री. मेघराज राजे भोसले, अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ यांच्या हस्ते करण्यात आले. सौ वंदना वानखडे,

श्री. मोतीलाल जी जैन, श्री. अर्जुन जी सिंघवी माजी नवी मुंबई एज्युकेशन चेअरमन, आणि श्री. निलेश सोमाणी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.




अवघ्या एका वर्षात भगवान भैरवांवरील १,१०७ मौलिक भक्तिगीते लिहिल्याबद्दल वर्ल्ड रेकॉर्ड्स बुक ऑफ इंडियाने त्यांच्या कार्याची "एका वर्षात सर्वाधिक गीते लिहिण्याचा" विश्वविक्रम म्हणून नोंद घेतली असून, हा त्यांचा ९वा विश्वविक्रम ठरला आहे.

यावेळी पद्मश्री अनुप जलोटा म्हणाले, "विराग मधुमालती यांनी भगवान भैरवांवरील १,१०७ भक्तिगीते लिहून भक्ती, श्रद्धा आणि साहित्य क्षेत्रात अद्वितीय कार्य केले आहे. 'भक्ती का महासागर' हा ग्रंथ भाविकांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल."

श्री. मेघराज राजे भोसले म्हणाले, "विराग मधुमालती यांचा हा विश्वविक्रम संपूर्ण भारतासाठी खूप अभिमानाची बाब आहे. कला, भक्ती आणि लेखनाच्या माध्यमातून त्यांनी समाजासमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे."

तसेच शिकारा ग्रुपचे श्री. अशोक मेहरा यांनी या कार्याला शुभेच्छा देत, सामाजिक व सांस्कृतिक कार्यासाठी आपले सहकार्य सदैव राहील, असे सांगितले.

विराग मधुमालती यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "हा ग्रंथ माझ्यासाठी केवळ पुस्तक नाही, तर भगवान भैरवांच्या चरणी अर्पण केलेली भक्ती आहे. हा सन्मान माझा नसून प्रत्येक भक्ताचा आहे, ज्यांच्या श्रद्धेने मला ही साधना पूर्ण करण्याची प्रेरणा दिली."

कार्यक्रमादरम्यान माध्यम प्रतिनिधींनी विराग मधुमालती यांच्याशी संवाद साधत त्यांच्या प्रेरणादायी प्रवासाविषयी आणि या ऐतिहासिक विश्वविक्रमामागील संकल्पनेविषयी माहिती जाणून घेतली. उपस्थितांनी त्यांच्या कार्याचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# सिडकोचा ऐतिहासिक टप्पा

## खारघर-तुर्भे बोगद्याच्या (टी-१) खोदकामाचा पारसिक टेकडीखाली यशस्वी मिलाप...!!

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई/प्रतिनिधी** : -खारघर-तुर्भे बोगदा हा नवी मुंबई मधील एक महत्त्वाचा रस्ते प्रकल्प आहे. या बोगद्यामुळे खारघर आणि तुर्भे यांच्यातील प्रवास अधिक जलद आणि सोयीस्कर होण्याची अपेक्षा आहे.काल या बोगद्याच्या टी-1 चा तुर्भे आणि खारघरकडून होणाऱ्या खोदकामाचा पारसिक टेकडी खाली यशस्वी मिलाप झाला. हा ऐतिहासिक क्षण सिडकोचे एक्झ्युक्युटिव्ह इंजिनिअर श्री.प्रकाश रोडे यांच्या मार्गदर्शनाखाली व रिथ्विक या बोगदे निर्मिती करण्यात सुप्रसिद्ध असलेल्या नामांकित कंपन्यांच्या तज्ञ अभियंत्याच्या कुशल नेतृत्वाचा परिपाक आहे.

बोगदा पारसिक टेकड्या परिसरातून जातो.यामुळे सध्या टेकड्यांना वळसा घालून करावा लागणारा प्रवास कमी होईल.प्रवासाचा वेळ आणि अंतर दोन्ही कमी होतील,



तसेच इंधनाची बचत होईल.हा प्रकल्प सिटी अँड इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन कडून विकसित केला जात आहे. बोगद्यात आधुनिक वायुवीजन, अग्निसुरक्षा, सीसीटीव्ही, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग आणि प्रकाशयोजना यांसारख्या सुविधा असतील. खारघर, तळोजा आणि पनवेल परिसरातून तुर्भे, वाशी आणि औद्योगिक भागात जाणे अधिक सोपे होईल.वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल.

जवाहरलाल नेहरू पोर्ट आणि इतर औद्योगिक भागांकडे जाणारी वाहतूक अधिक कार्यक्षम होऊ शकते. नवी मुंबईतील पूर्व-पश्चिम जोडणी सुधारेल.हा प्रकल्प अनेक वर्षांपासून नियोजन आणि विविध प्रशासकीय टप्प्यांतून पुढे सरकत आहे. आज त्यातील महत्वाचा टप्पा सिडकोने गाठला आहे.

# पनवेलच्या सर्वांगीण विकासासाठी मुलभूत सुविधांबाबत तातडीने कारवाई करण्याची शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि इतर मूलभूत सुविधांबाबत तातडीने कार्यवाही करण्याची मागणी आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांना निवेदन सादर करून करण्यात आली.

यावेळी शिवसेनेचे उपनेते बबनदादा पाटील, संपर्क प्रमुख प्रसाद भोईर, जिल्हाप्रमुख दीपक निकम, उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, उपजिल्हाप्रमुख भरत पाटील, नगरसेविका तथा गटनेत्या लिना गरड, नगरसेवक उत्तम मोर्बेकर, शहरप्रमुख प्रवीण जाधव, यतीन देशमुख, सदानंद शिर्के, अजय पाटील, कैलास पाटील, मा.सरपंच घोट सुनील पाटील, सिद्धेश चव्हाण, तुषार निढाळकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



यावेळी बोलताना उपनेते बबनदादा पाटील यांनी सांगितले की, मुंबईचे प्रवेशद्वार तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगत असलेल्या पनवेल शहराचा झपाट्याने विस्तार होत आहे. मोठ्या प्रमाणात गृहनिर्माण प्रकल्प, औद्योगिक विकास, शैक्षणिक संस्था आणि व्यापारी संकुले उभी राहत असताना नागरिकांना आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांवर अपेक्षित प्रमाणात काम होत नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली आहे. तसेच संपर्कप्रमुख प्रसाद भोईर यांनी सांगितले की, शिवसेनेने पनवेलकरांसाठी शाश्वत पिण्याच्या पाण्याचा आराखडा जाहीर करण्याची प्रमुख मागणी केली आहे. सिडकोकडून होत असलेला विद्यमान पाणीपुरवठा भविष्यातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता अपुरा पडण्याची शक्यता असल्याने शिलार धरण, देहरंग धरणाची उंची वाढविणे, नवीन जलस्रोतांचा शोध, जलशुद्धीकरण प्रकल्प उभारणी आणि वितरण व्यवस्थेचे आधुनिकीकरण यासाठी निश्चित कालमर्यादेसह कृती आराखडा जाहीर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तर जिल्हाप्रमुख दिपक निकम यांनी यावेळी बोलताना सांगितले की, महापालिका क्षेत्रातील 50 हून अधिक जिल्हा परिषद शाळांचे हस्तांतरण अद्याप प्रलंबित असल्याने विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक सुविधा मिळण्यात अडथळे येत आहेत. या शाळांचे तातडीने महापालिकेकडे हस्तांतरण करून दर्जेदार वर्गखोल्या, प्रयोगशाळा, डिजिटल शिक्षण, स्वच्छतागृहे, क्रीडा साहित्य आदी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली. पनवेलच्या सर्वांगीण विकासासाठी महापालिकेने तातडीने ठोस निर्णय घेऊन नागरिकांच्या समस्या सोडवाव्यात, अशी मागणी शिवसेनेद्वारे करण्यात आली आहे.

# उरणच्या एन. आय. हायस्कूलमध्ये विद्यार्थिनींना मासिक पाळी आरोग्याचे धडे

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : येथील एन. आय. हायस्कूलमध्ये इयत्ता नववी आणि १०वीच्या विद्यार्थिनींसाठी मासिक पाळी आरोग्य व स्वच्छता जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'श्री समर्थ कृपा सखी स्वयं सहाय्यता संस्था' (उरण) आणि 'शीलक्ष्मी सोशल फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने हा स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला.



या कार्यक्रमात विद्यार्थिनींना मासिक पाळीदरम्यान घ्यावयाची काळजी, वैयक्तिक स्वच्छता आणि योग्य सॅनिटरी नॅपकिनचा वापर कसा करावा, याचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच या विषयाशी संबंधित असलेले विविध गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रसंगी शाळेतील ९५ विद्यार्थिनींना कॉटनच्या सॅनिटरी नॅपकिनचे मोफत वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला 'श्री समर्थ कृपा सखी स्वयं सहाय्यता संस्थे'च्या अध्यक्षा समाजसेविका ,रायगड भुषण संगीता सचिन ढेरे (रायगड भूषण), उपाध्यक्ष मीनाक्षी कोळी तसेच 'शीलक्ष्मी सोशल फाउंडेशन'च्या अध्यक्षा रजनी ताजणे उपस्थित होत्या. त्यांच्यासोबतच हृदया, भैरवी, चौधरी सर, शाळेच्या माजी व ज्येष्ठ शिक्षिका कुमार मॅडम, मुख्याध्यापक एल. एम. भोये, पर्यवेक्षक भूषण झोपे आणि पर्यवेक्षिका जगताप मॅडम यांनीही कार्यक्रमाला हजेरी लावली.

## ९५ मुलींना सॅनिटरी नॅपकिनचे वाटप!

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थिनींनी या उपयुक्त उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. अशा प्रकारचे आरोग्य जनजागृती उपक्रम नियमित पणे आयोजित करण्याची गरज असल्याचे मत उपस्थित आणि व्यक्त केले कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन शिक्षिका दिपाली पाटील यांनी केले तर सहाय्यक शिक्षक खरमाटे एस बी सर आणि कवितके मॅडम यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

# पनवेल शहराला पाणी पुरवठा करणारं देहरंग धरण झाले ओव्हरफ्लो

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : पनवेल शहरासाठी महत्त्वाचा जलस्रोत असलेल्या अप्पासाहेब वेदक (देहरंग) धरणाच्या सांडव्यावरून गुरुवारी पहाटेपासून पाणी वाहू लागले. गेल्या काही महिन्यांपासून धरणातील पाणीसाठ्याने तळ गाठल्याने निर्माण झालेली पाणीटंचाईची चिंता यामुळे काही प्रमाणात कमी झाली आहे. धरण परिसरात झालेल्या समाधानकारक पावसामुळे धरण भरू लागल्याने पनवेलकरांना दिलासा मिळाला आहे.



देहरंग धरणाची पाणीसाठा क्षमता 3.125 घनलक्ष मीटर आहे. पनवेल शहरातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी या धरणाचा उपयोग केला जातो. मात्र, वाढत्या लोकसंख्येमुळे धरणातील पाणीसाठा अपुरा पडू लागल्याने पनवेल महापालिकेला महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (एमजेपी) आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) यांच्याकडून अतिरिक्त पाणी घ्यावे लागत आहे. या धरणातून दररोज सुमारे 16 दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी उपसा केला जात होता. मागील महिनाभर धरणातील पाणीसाठा संपुष्टात आल्याने धरणक्षेत्र कोरडे पडले. त्यामुळे पाणीपुरवठ्याचे नियोजन करताना महापालिकेला विशेष उपाययोजना कराव्या लागल्या होत्या. सध्या धरणात आलेल्या पाण्यामध्ये मातीच्या गाळाचे प्रमाण अधिक असल्याने सांडव्यावरील दरवाजे बंद करण्यात आलेले नाहीत. गाळयुक्त पाणी वाहून जाऊन स्वच्छ पाणी धरणात साठावे, असे महापालिकेचे प्रयत्न सुरू आहेत. आणखी समाधानकारक पाऊस झाल्यानंतर धरणात पाणीसाठा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मे महिन्यात धरणातील अपुरा पाणीसाठा आणि एल निनोच्या प्रभावामुळे राज्य शासनाच्या सूचनेनुसार पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी पनवेल महापालिकेने आठवड्यातून एक दिवस पाणीपुरवठा बंद ठेवण्याचे नियोजन केले होते. आता धरणाच्या सांडव्यावरून पाणी वाहू लागल्याने शहराच्या पाणीपुरवठ्याबाबत काही प्रमाणात दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# साई ट्रस्ट जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालयात विद्यार्थिनींसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन पास सेवेचा सेवेचा शुभारंभ



**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : 1 जुलै 2026 रोजी उरण एसटी आगार व्यवस्थापक श्री. तुषार गद्रे साहेब आणि वाहतूक नियंत्रक श्री रोशन म्हात्रे साहेब यांनी साई ट्रस्ट जवाहरलाल नेहरू पोर्ट माध्यमिक विद्यालयाला भेट दिली. यावेळी त्यांनी आपल्या विद्यार्थिनींसाठी मोफत एसटी पास सेवेचा शुभारंभ केला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री गिरीश पाटील सर यांना त्यांनी विद्यार्थ्यांना देण्यात येणारे एसटीचे पास सुपूर्द केले. सदर कार्य गेले अनेक वर्ष शाळेचे आदर्श शिपाई श्री वसंत कडू दादा हेया संदर्भातीलकार्यभार सांभाळत होते

# उपचारांसोबत कलांचाही आविष्कार; मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये डॉक्टर दिन उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी** : दरवर्षी १ जुलै रोजी डॉक्टर दिन म्हणून साजरा केला जातो. डॉक्टर दिनानिमित्त मेडिकव्हर हॉस्पिटल, नवी मुंबई येथे डॉक्टरांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. आयुष्यभराची सेवा... उपचारांचा समृद्ध वारसा या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमात उपस्थित डॉक्टरांना सन्मानित करण्यात आले.रुग्णालय परिसरात झालेल्या या कार्यक्रमाला डॉक्टर, रुग्णालयाचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी रुग्णालयाचे केंद्र प्रमुख संदिप जोशी यांनी डॉक्टरांच्या अथक परिश्रमांचे, वैद्यकीय कौशल्याचे कौतुक केले.या ठिकाणी आयोजित कार्यक्रमात डॉक्टरांनी आपल्या सुप्त कलागुण सादर केले. गायन, नृत्य, कविता सादरीकरण, संगीत आणि इतर कलाविष्कारांमधून त्यांनी उपस्थितांची मनं जिंकली. विविध खेळ, टीम-बिल्डिंग उपक्रम, प्रश्नमंजुषा आणि मनोरंजनात्मक सत्रांमुळे विविध विभागांतील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांमध्ये संवाद अधिक दृढ झाला.



संदिप जोशी(केंद्र प्रमुख, मेडिकव्हर हॉस्पिटल्स, नवी मुंबई) सांगतात की, या निमित्ताने डॉक्टरांना एकमेकांशी संवाद साधण्याची आणि व्यावसायिक नातेसंबंध अधिक मजबूत करण्याची संधी मिळाली. रुग्ण बरा होऊन आपल्या घरी परतणे हीच डॉक्टरांसाठी सर्वात मोठी प्रेरणा आहे. डॉक्टर दिन हा समाजासाठी निःस्वार्थपणे सेवा करणाऱ्या प्रत्येक डॉक्टरांच्या योगदानाची दखल घेण्याचा आणि त्यांचा सन्मान करण्याचा दिवस आहे.नीरज लाल(मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे महाराष्ट्र आणि कर्नाटक विभागाचे प्रादेशिक संचालक) म्हणाले, डॉक्टर हे प्रत्येक यशस्वी आरोग्यसंस्थेचा कणा असल्याचे सांगत त्यांच्या ज्ञान, समर्पण आणि संवेदनशीलतेमुळे रुग्णांच्या जीवनात मोठा सकारात्मक बदल घडतो, असे नमूद केले. या कार्यक्रमातून मेडिकव्हर हॉस्पिटलने आपल्या वैद्यकीय तज्ज्ञांच्या अमूल्य योगदानाचा गौरव करत सहकार्य, वैद्यकीय उत्कृष्टता आणि रुग्णकेंद्रित आरोग्यसेवेची संस्कृती अधिक बळकट करण्याचा संदेश दिला.

# नीट पेपर फुटी मुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत असलेल्या केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पदावरून तात्काळ हटवा –विविध सामाजिक संघटनेची मागणी

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा** -नीट पेपर फूटप्रकरणी 17 विद्यार्थ्यांच्या आत्महत्येस प्रवृत्त असलेले भारताचे शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना त्यांच्या पदावरून तात्काळ हटविण्यात यावे व सोनम वांगचू यांच्या जंतर-मंतर येथील आमरण उपोषणाला समर्थन देण्याकरता आज दिनांक 2 जुलै 2026 ला लाखांदूर येथे भव्य धरणे ,निदर्शने आंदोलने करण्यात आली. याबाबत सविस्तर वृत्त असे की, देशात नीट चे पेपर फुटल्यामुळे 17 विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली आहे. नीट च्या परीक्षा सुरळीत पार पडल्या असत्या तर 17 विद्यार्थ्यांनी आत्महत्या करण्याची वेळ आली नसती. मात्र शिक्षण मंत्री यांच्या दुर्लक्ष पणामुळे व शिक्षण विभागाच्या भोंगळणामुळे सर्व घडले आहे. देशाचा आतापर्यंत 80 पेक्षा जास्त वेळा पेपर फुटले असून लाखो तरुणांचे जीवन जीवन उध्वस्त झाले आहे हे सर्व शासनाच्या नातर नातरके पणाचे परिणाम आहेत. त्यामुळे देशाचे शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना त्यांच्या मंत्री पदावरून तात्काळ हटविण्यात यावे.



शिक्षण प्रणाली मध्ये सुधारणा करून नीट पेपर फुटी करिता शिक्षण मंत्री यांना जबाबदार धरून त्यांना तात्काळ पदावरून हटविण्यात यावे या मागणी करिता अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वात काक्रोज जनता पार्टीच्या बॅनरखाली दिल्ली येथे जंतर मंतरवर शेकडो युवकांनी 20 जून 2026 पासून धरणे आंदोलनाला सुरुवात केली आहे. तसेच सोनम वांगचूंग यांनी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामाच्या मागणीसाठी दिल्ली येथे जंतर-मंतरवर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या आंदोलनास विविध सामाजिक संघटनेच्या वतीने समर्थन देण्यात आले .

अभिजीत दिपके व आंदोलन करते विद्यार्थी यांच्या मागण्या संबंधित चर्चा न करता उलट त्यांना तो पाकिस्तानी आतंकवादीची बी टी म्हणून अपमानित केले जात आहे .अभिजीत दिपके हे संविधानिक मार्गाने ,शांतता मार्गाने आंदोलन करीत असून त्यांच्या आंदोलन स्थळी काही गुंड प्रवृत्तीचे लोक जाऊन मारण्याची धमकी करीत आहेत अशा गुंड प्रवृत्तीच्या लोकांवर कारवाई करण्याऐवजी पोलीस मात्र बघायची भूमिका घेत आहेत .आंदोलन स्थळावरील वीज ,पाणी, एवढेच नाही तर आंदोलन कर्त्यांना देण्यात येणारे खाद्य सुद्धा रोखले जात आहे ही अत्यंत निंदनीय बाब आहे अशा गुंड प्रवृत्तीचा निषेध करण्यात येत आहे व खालील मागण्यांच्या पूर्ततेसाठी विविध सामाजिक संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात येत आहे. नीट चे पेपर फुटल्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या त्यांच्या कुटुंबांना एक कोटी रुपयाची आर्थिक मदत देण्यात यावी ,नीट पेपर फुटीस जबाबदार असलेले शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना तात्काळ मंत्रिपदावरून हटविण्यात यावे ,टीईटी पेपर फुटीस जबाबदार म्हणून महाराष्ट्राचे शिक्षण मंत्री दादा भुसे यांना तात्काळ मंत्री पदावरून हटविण्यात यावे, दिल्ली येथील आंदोलन स्थळी आंदोलन कर्त्यास मारझोड करणाऱ्या गुंड प्रवृत्तीच्या लोकांवर तात्काल कारवाई करण्यात यावी ,आंदोलन स्थळावरील वीज ,पाणी बंद करणाऱ्या तसेच आंदोलन कर्त्यास खाद्य पुरवठा रोखणाऱ्या अधिकाऱ्याला ताबडतोब निलंबित करण्यात यावे ,असे मागण्यांचे निवेदन तहसीलदार लाखांदूर मार्फत देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदन देताना चंद्रशेखर टेंभुर्णे माजी समाज कल्याण सभापती भंडारा, सुरेश ब्राह्मणकर सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती लाखांदूर, विनोद ढोरे लाखांदूर तालुका अध्यक्ष उभाठा, नरेश दिवटे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार, मंगेश राऊत पंचायत समिती सदस्य लाखांदूर ,,प्राध्यापक अनिल काणेकर ,हमराज डोये, प्रकाश बारसागडे, नीरु ताई मेश्राम,संदीप मरगडे व अनेक कार्यकर्ते यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

# स्पीड ब्रेकरवर पांढरे पट्टे मारण्याची मागणी



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : पनवेल तालुक्यातील विविध ठिकाणच्या रस्त्यांवर स्पीड ब्रेकर टाकण्यात आलेले आहेत. मात्र या ठिकाणी पांढरे पट्टे नसल्याने अपघात होत आहेत. त्यामुळे पांढरे पट्टे मारण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते जनार्दन मगर यांनी केली आहे.

पनवेल तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यांवर अनेक ठिकाणी स्पीड ब्रेकर उभारण्यात आलेले आहेत. अनेक गावा ठिकाणी देखील स्पीड ब्रेकर आहेत. मात्र या स्पीड ब्रेकर वर पांढरे पट्टे नसल्याने छोटे-मोठे अपघात होत आहेत. स्पीड ब्रेकर वर पांढरे पट्टे नसल्याने स्पीड ब्रेकरवरून वाहने उडून अपघात होत आहेत. तसेच बहुतांश ठिकाणी स्पीड ब्रेकर असल्याच्या पाट्या देखील लावण्यात आलेले नाहीत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे याकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे. पांढरे पट्टे मारणे तसेच पाट्या लावणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे स्पीड ब्रेकर वर पांढरे पट्टे मारावेत आणि या ठिकाणी स्पीड ब्रेकर असल्याच्या पाट्या लावाव्यात अशी मागणी जनार्दन मगर यांनी केली आहे.

# वाढदिवसाचा 'दिखाऊ' खर्च टाळला; अन्वीच्या चापे कुटुंबाचा अनोखा आदर्श



**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : आजच्या धकाधकीच्या आणि दिखाऊपणाच्या काळात वाढदिवस म्हणजे महागडा केक, फटाके आणि पार्ट्या असा समज झाला आहे. मात्र, याला छेद देत सिल्लोड तालुक्यातील अन्वी येथील चापे कुटुंबाने एक स्तुत्य पायंडा पाडला आहे. आपला मुलगा अभिमन्यू चापे याच्या वाढदिवसानिमित्त महागड्या गोष्टींवर खर्च न करता, वृक्षारोपण करून निसर्ग संवर्धनाचा संदेश या कुटुंबाने दिला आहे.

•मुलावर निसर्ग प्रेमाचे संस्कार•

निसर्गप्रेमी शिवानंद चापे आणि कोमल चापे या दांपत्याने वाढदिवस साजरा करण्याची एक वेगळी पद्धत सुरू केली आहे. मुलाच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी वृक्षारोपण करण्याचा त्यांचा संकल्प आहे. विशेष म्हणजे, अभिमन्यूच्या वयाइतकीच रोपे लावली जातात. यावर्षी त्याच्या पाचव्या वाढदिवसानिमित्त त्याने शिक्षण घेत असलेल्या 'सर्वज्ञ बालक मंदिर' शाळेच्या आवारात कदंब आणि वडाच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. अशा उपक्रमातून मुलांवर लहानपणापासूनच पर्यावरणाची जपणूक करण्याचे संस्कार केले जात आहेत.

शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षक वृंद या उपक्रमात मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. चापे कुटुंबाच्या या संवेदनशील उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे. यावेळी पोलीस अधिकारी उत्तम चापे, सूर्यकिरण अर्बन बँकेचे अध्यक्ष किरण पाटील पवार यांच्यासह अनेकांनी उपस्थित राहून चि. अभिमन्यूला शुभेच्छा दिल्या आणि त्याच्या या 'हिरव्या' वाढदिवसाचे स्वागत केले.

# उरणकरांच्या तक्रारी आता थेट नगरपरिषदेकडे

## 2 जुलैपासून व्हॉट्सअॅप हेल्पलाईन, 13 जुलैला जनता दरबार

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी** : उरण शहरातील नागरिकांना नागरी सुविधांशी संबंधित किरकोळ अथवा गंभीर समस्यांसाठी वारंवार नगरपरिषद कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत, त्यांच्या तक्रारी थेट प्रशासनापर्यंत पोहोचाव्यात आणि त्यावर तातडीने कार्यवाही व्हावी, या उद्देशाने उरण नगरपरिषदेने प्रथमच महत्त्वपूर्ण पाउल उचलत नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी 2 जुलैपासून2026 पासून 8657320768 हा व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्रमांक सुरू केला असल्याची घोषणा केली असून, 13 जुलै रोजी नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून घेण्यासाठी 'जनता दरबार' आयोजित करण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे. या दोन्ही उपक्रमांमुळे नागरिकांना प्रशासनाशी थेट संवाद साधण्याची संधी उपलब्ध होणार असल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.




नगरपरिषदेकडे तक्रार करण्यासाठी नागरिकांना अनेकदा प्रत्यक्ष कार्यालयात जावे लागते. काही वेळा तक्रारींचे निराकरण होण्यास विलंब होत असल्याचीही नाराजी व्यक्त केली जाते. या पार्श्वभूमीवर नागरिक आणि प्रशासन यांच्यातील संवाद अधिक प्रभावी करण्यासाठी व्हॉट्सअॅप हेल्पलाईन सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे उरणच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी स्पष्ट केले.

इहेल्पलाईनवर नागरिकांनी आपल्या परिसरातील रस्ते, गटारे, पाणीपुरवठा, पथदिवे, कचरा, जलभराव, स्वच्छता किंवा इतर नागरी समस्यांचे फोटो, व्हिडिओ आणि आवश्यक माहिती 8657320768 या क्रमांकावर पाठवावीअसे आवाहन नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी केले आहे. प्राप्त तक्रारींची तत्काळ दखल घेऊन त्या संबंधित विभागाकडे पाठविल्या जातील आणि शक्य तितक्या कमी वेळेत त्यावर कार्यवाही करण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही भूमिकात्यांनी स्पष्ट केली.

याशिवाय नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेण्यासाठी आणि त्यावर संबंधित अधिकाऱ्यांसमवेत चर्चा करून तोडगा काढण्यासाठी १३ जुलै रोजी 'जनता दरबार' आयोजित करण्यात येणार आहे. या दरबारात नागरिकांना आपल्या भागातील प्रलंबित प्रश्न, विकासकामांतील अडचणी आणि नागरी सुविधांबाबतच्या तक्रारी थेट नगराध्यक्षा आणि प्रशासनासमोर मांडण्याची संधी मिळणार आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.त्यामुळे उरणकरांचे लक्ष केवळ हेल्पलाईन सुरू झाल्या नसून, त्या माध्यमातून होणाऱ्या प्रत्यक्ष कामकाजाकडे लागले आहे.

# संकेत हुमणे विद्युत सहाय्यक यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गराडा बुज व मेंढा येथील विद्यार्थ्यांना दिल्या शालेय भेटवस्तू



**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे भंडारा** : तालुक्यातील -गराडा बुज येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील विद्यार्थी आणि दहावी बारावीच्या प्राविण्य विद्यार्थीना त्यांच्या यशाबद्दल कौतुकाची थाप मिळावी व अशाकार्यामुळे त्यांना उज्वल भविष्यासाठी प्रेरणा मिळावी या उदात्त हेतूने स्मृती. मंजुषाबाई पतिरामजी हुमणे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गराडा बुज येथील विद्यार्थ्यांना व दहावी आणि बारावीच्या परिक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार श्री.संकेत हुमणे यांच्या हस्ते सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय बॅग देऊन सत्कार करण्यात आले. यामध्ये वर्ग बारावी मध्ये कुमारी सिमरण गणेश जगनाडे व इयत्ता १० वी तील विद्यार्थीनी कुमारी. रोशनी राजु सार्वे या गुणवंत विद्यार्थ्यांना गौरविण्यात येवून पुढील शैक्षणिक वाटचालीस संकेत हुमणे यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले. गावची शाळा टिकविण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केला पाहिजे, आपले मुले मुली जिल्हा परिषद शाळेमध्येच शिकविली पाहिजे, गावची शाळा बंद पडल्यास गरीब विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण बाहेरगावी घेणे किती कठीण होईल म्हणून त्यामुळे आपल्या गावची जिल्हा परिषद शाळा वाचण्यासाठी प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे जेणेकरून भविष्यात कोणीही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही. तसेच शाळेचा विकास हाच गावाचा विकास यासाठी ग्रामपंचायतने शाळेसाठी लागणाऱ्या सुविधा विविध योजनेमधून पूर्ण कराव्यात असे मनोगत संकेत हुमणे यांनी व्यक्त केले.तसेच कुमारी पायल चव्हाण हिने सुद्धा जिल्हा परिषद शाळेला शैक्षणिक साहित्य भेट दिले.

याप्रसंगी गराडा बुजचे सरपंच मंगला चव्हाण, उपसरपंच निलिमा गाढवे, माजी पं. समिती सदस्य परसराम देशमुख, विक्की मेश्राम, साहिल हुमणे, मंगेश गाढवे, तुषार गजभिये, नितेश गोंडाणे मालता चव्हाण, रंजूबाई गवरे, रमा चव्हाण, प्रमोद गाढवे शालेय समिती अध्यक्ष, संदिप बावनकुळे, गौरव लांजेवार, सौरभ गाढवे, सौरभ चव्हाण , संदिप गाढवे, धिरज चव्हाण, साहिल भोयर, अजय मेश्राम, गिरिश मेश्राम, हे सर्व उपस्थित होते.

# मांजरा नदी पुलावरील खड्ड्यांनी नागरिकांचा जीव धोक्यात

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)** : पाटोदा शहरातील मांजरा नदी पुलावरील मोठमोठ्या खड्ड्यांमुळे नागरिकांचा प्रवास धोकादायक बनला आहे. सुरू असलेल्या पावसामुळे पुलावरील खड्ड्यांमध्ये पाणी साचत असून, वाहनधारकांना खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. तसेच, भरधाव वाहनांमुळे चिखलमिश्रित पाणी पादचारी व दुचाकीस्वारांच्या अंगावर उडत असल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत नगरसेवक संतोष (दादा) जाधव यांनी प्रशासनावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. "उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार साहेब रोज याच मांजरा नदीच्या पुलावरून ये-जा करतात. पुलाची दुरवस्था त्यांच्या नजरेस पडत नाही का? लोकांचे मणके मोडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का?" असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. पुलावरील खड्ड्यांमुळे दररोज शेकडो नागरिक, विद्यार्थी, शेतकरी आणि व्यापाऱ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पावसामुळे खड्डे पाण्याखाली गेल्याने अनेक दुचाकीस्वारांचे संतुलन बिघडत असून, मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही, नागरिकांनीही पुलाची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. संबंधित विभागाने तात्काळ पुलावरील खड्डे बुजवून वाहतूक सुरक्षित करावी. तसेच निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित ठेकेदाराची चौकशी करून आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी नगरसेवक संतोष (दादा) जाधव यांनी केली आहे. अन्यथा नागरिकांच्या हितासाठी तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा ही या वेळी जाधव यांनी दिली आहे.



**"लोकांचे मणके मोडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का?" :– नगरसेवक संतोष (दादा) जाधव**

# सणसर ग्रामपंचायतीची पालखी सोहळ्यापूर्वी युद्धपातळीवर तयारी ; मूलभूत सुविधांच्या कामांना वेग



**दैनिक युवक आधार**
**सणसर : विकास क्षत्रिय** : संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर सणसर ग्रामपंचायतीने गावातील मूलभूत सुविधांच्या कामांना युद्धपातळीवर सुरुवात केली असून,वारकरी व ग्रामस्थांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी विविध विकासकामे प्राधान्याने हाती घेण्यात आली आहेत.पालखी मार्गावरील गावात मुरूम टाकणे,रस्त्यांची दुरुस्ती, गटर लाईनची स्वच्छता व दुरुस्ती,सार्वजनिक शौचालयांची देखभाल,पिण्याच्या पाण्याची व्यवस्था,लाईट व्यवस्था,विहीर व बोअरवेल दुरुस्ती आदी कामे वेगाने सुरू आहेत.तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील उपलब्ध आरोग्य सुविधांचाही आढावा घेऊन आवश्यक त्या सुधारणा करण्यात येत असल्याचे दिसून येत आहे.या सर्व कामांवर ग्रामपंचायतीचे प्रशासक सरपंच यशवंत पाटील आणि ग्रामविकास अधिकारी सचिन पवार स्वतः जातीने लक्ष ठेवून संबंधित यंत्रणेकडून कामे करून घेत आहेत.त्यामुळे पालखी सोहळ्यापूर्वी गावातील सुविधा अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न होत असल्याचे ग्रामस्थांकडून सांगितले जात आहे.ग्रामपंचायतीचे कर्मचारी प्रविण शिंदे,योगेश शेलार,विनोद भाग्यवंत,जगदीश चितारे, भाऊसाहेब सोनवणे आणि सचिन गायकवाड हे देखील पूर्ण समन्वयाने काम करत असून,स्वच्छता, दुरुस्ती व अन्य आवश्यक कामांमध्ये दिवसरात्र मेहनत घेत आहेत. संपूर्ण ग्रामपंचायत टीमच्या कार्यतत्परतेमुळे गावात पालखी सोहळ्याच्या तयारीला चांगला वेग आला असल्याची भावना ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.संत तुकाराम महाराज पालखी सोहळया दरम्यान लाखो वारकरी सणसर मार्गे पंढरपूर प्रवास करतात.त्यांना स्वच्छ,सुरक्षित व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायतीने सुरू केलेल्या कामांचे ग्रामस्थांकडून स्वागत होत आहे.

# थेरोंडा फाटा येथे अलिबाग अर्बन बँकेची नवी वास्तू; आधुनिक सेवांसह ग्राहकांच्या सेवेत नवे पर्व

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा** : सहकार क्षेत्रातील विश्वासार्ह आणि ग्राहकाभिमुख बँक म्हणून ओळख असलेल्या अलिबाग को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लिमिटेडच्या थेरोंडा शाखेचे नवीन व प्रशस्त वास्तूमध्ये स्थलांतर करण्यात आले असून, या नव्या शाखेचे उद्घाटन बँकेच्या चेअरमन सौ. सुप्रिया जयंत पाटील यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या उद्घाटन सोहळ्यामुळे थेरोंडा परिसरातील नागरिक, व्यापारी, शेतकरी आणि खातेदारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नवीन शाखा अधिक प्रशस्त, सुसज्ज आणि ग्राहकांना आधुनिक बँकिंग सुविधा उपलब्ध करून देणारी असल्याने परिसरातील नागरिकांसाठी ती मोठी सुविधा ठरणार आहे. ग्रामीण व उपनगरी भागातील नागरिकांना सुरक्षित, जलद आणि दर्जेदार बँकिंग सेवा देण्याच्या उद्देशाने बँकेने हे पाऊल उचलले असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले.




उद्घाटनप्रसंगी बँकेचे व्हाईस चेअरमन सुभाष म्हात्रे, संचालक मंडळाचे सदस्य नितीन म्हात्रे, सुरेश खोत, निलेश खोत, खलिल तांडेल, तसेच माजी सरपंच मनिषा चुनेकर, हेमंत गणपत, शरद पाटील, संगीता पाटील, मधुकर फुंडे, सरोज वरसोलकर, संदीप खोत, डॉ विजय वरसोलकर,अमित फुंडे, प्रमोद नवखारकर, शरद वरसोलकर यांच्यासह मोठ्या संख्येने खातेदार व नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नवीन वास्तूची विधिवत पूजा शरद पाटील आणि संगीता पाटील यांच्या हस्ते संपन्न झाली. धार्मिक विधीनंतर चेअरमन सौ. सुप्रिया जयंत पाटील व सुरेश खोत यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांनी फीत कापून शाखेचे उद्घाटन केले. यावेळी उपस्थितांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा घेत नव्या शाखेच्या माध्यमातून अधिकाधिक ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्याचा विश्वास व्यक्त केला.

चेअरमन सौ. सुप्रिया जयंत पाटील यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "ग्राहकांचा विश्वास हीच आमची खरी ताकद आहे. बदलत्या काळानुसार आधुनिक बँकिंग सेवा ग्रामीण भागापर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न असून, थेरोंडा शाखेच्या नव्या वास्तूमुळे ग्राहकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होतील. सहकाराच्या माध्यमातून आर्थिक विकासाला चालना देणे हेच आमचे ध्येय आहे."

यावेळी उपस्थित मान्यवरांनीही अलिबाग अर्बन बँकेने अल्पावधीत ग्राहकांचा विश्वास संपादन करत सहकार क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केल्याबद्दल कौतुक केले. ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन अत्याधुनिक सुविधा, जलद व्यवहार, विविध बचत व कर्ज योजना आणि विश्वासार्ह सेवा उपलब्ध करून देण्यात बँक आघाडीवर असल्याचे त्यांनी नमूद केले.

उद्घाटन सोहळ्यास परिसरातील व्यापारी, उद्योजक, महिला बचत गटांच्या प्रतिनिधींसह शेकडो खातेदार उपस्थित होते.

नवीन शाखेमुळे थेरोंडा, रेवदंडा, चौल व आसपासच्या गावांतील नागरिकांना बँकिंग व्यवहारांसाठी अधिक सोयीस्कर आणि सुलभ सेवा उपलब्ध होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

सहकार, विश्वास आणि आधुनिकतेचा संगम साधत अलिबाग को-ऑपरेटिव्ह अर्बन बँकेने थेरोंडा येथे सुरू केलेले हे नवे पर्व परिसराच्या आर्थिक विकासाला निश्चितच नवी दिशा देणारे ठरणार आहे.

# राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त ७६ गरजू रुग्णांना मोफत नेत्रशस्त्रक्रियेचा लाभ

**दैनिक युवक आधार**
**मुरुड प्रतिनिधी** : राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त विशाल कणसे यांच्या माध्यमातून समाजसेवेचा आदर्श उपक्रम राबवत मुरुड परिसरातील ७६ गरजू रुग्णांना सोलापूर येथील शंकरशेठ साबळे आय हॉस्पिटल येथे मोफत नेत्रशस्त्रक्रियेसाठी पाठविण्यात आले.

या उपक्रमाअंतर्गत मोतीबिंदूसह विविध नेत्रविकारांवरील शस्त्रक्रिया व उपचारांचा लाभ आर्थिकदृष्ट्या दुर्बल, ज्येष्ठ नागरिक आणि गरजू रुग्णांना मिळणार आहे. रुग्णांची सुरक्षित वाहतूक तसेच आवश्यक सर्व व्यवस्था करण्यात आली.

या प्रसंगी आयोजकांनी सांगितले की, "डॉक्टर हे समाजासाठी देवदूतासारखे कार्य करतात. राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त त्यांच्या सेवाभावाला मानवंदना देत गरजू रुग्णांच्या आयुष्यात पुन्हा प्रकाश आणण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे."



समाजातील प्रत्येक गरजू व्यक्तीपर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचावी, या उद्देशाने भविष्यातही अशा सामाजिक आरोग्य उपक्रमांचे आयोजन सातत्याने करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त सर्व डॉक्टरांना मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# रायगड दरडींच्या उंबरठ्यावर; १०३ वरून ३९२ गावांपर्यंत वाढला धोका

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा :** पावसाचा जोर वाढत असताना रायगड जिल्ह्यावर दरडींचे संकट पुन्हा एकदा गडद झाले असून, गेल्या दहा वर्षांत दरडप्रवण गावांची संख्या तब्बल १०३ वरून ३९२ पर्यंत पोहोचल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. ही वाढ केवळ निसर्गाचा कोप नसून, बेकायदा डोंगर उत्खनन, अनधिकृत भराव, बेसुमार वृक्षतोड, डोंगर पोखरून उभारली जाणारी बांधकामे आणि नियोजनशून्य विकासाचा परिणाम असल्याची चर्चा पर्यावरण अभ्यासक आणि नागरिकांमध्ये सुरू आहे.

एकीकडे शासन पर्यावरण संवर्धनाच्या घोषणा करत असताना दुसरीकडे रायगडच्या डोंगररांगा अक्षरशः ओरबाडल्या जात आहेत. जिकडे तिकडे भरावासाठी माती उपसा, टेकड्या सपाट करण्याचे प्रकार, बेकायदा उत्खनन आणि डोंगरपायथ्याशी वाढलेली वस्ती यामुळे भूस्खलनाचा धोका दिवसेंदिवस वाढत चालला आहे. मात्र, या सर्व प्रकारांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

पोलादपूर-महाड बनले 'रेड झोन' जिल्ह्यातील ३९२ दरडप्रवण गावांपैकी सर्वाधिक सुमारे १४० गावे पोलादपूर तालुक्यात असून, महाड तालुक्यातील सुमारे १२१ गावे धोक्याच्या छायेत आहेत. याशिवाय माणगाव, रोहा, सुधागड, खालापूर, कर्जत, मुरुड, अलिबाग, श्रीवर्धन आणि म्हसळा तालुक्यांतील अनेक गावेही संवेदनशील श्रेणीत आहेत.महाड तालुक्यातील तळिये, पोलादपूर परिसरातील अनेक वाड्या-वस्त्या, बिरवाडी परिसर, सावित्री खोऱ्यातील डोंगरपायथ्याची गावे, खालापूर-कर्जत पट्टा, तसेच मुरुड तालुक्यातील साळाव परिसराने यापूर्वी दरडींचे भयावह



परिणाम अनुभवले आहेत. तरीही धोकादायक भागातील बांधकामे आणि पर्यावरणाची हानी रोखण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे.

**इतिहासाची पुनरावृत्ती होण्याची भीती**

रायगड जिल्ह्याने यापूर्वी अनेक भीषण दुर्घटना अनुभवल्या आहेत. २००५ च्या अतिवृष्टीत महाड आणि पोलादपूर परिसरात दरडी कोसळून सुमारे ३०० जणांचा बळी गेला होता. २०१५ मध्ये नेरळ परिसरातील दुर्घटनेने अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली. २०२१ मध्ये महाड तालुक्यातील तळिये गावात झालेल्या भीषण भूस्खलनात ८४ नागरिकांचा मृत्यू झाला होता. त्या दुर्घटनेची चित्रे आजही राज्य विसरलेले नाही.

प्रश्न असा आहे की, प्रत्येक दुर्घटनेनंतर मदतीची घोषणा आणि चौकशी समित्या नेमण्यापलीकडे नेमके काय बदलले?

## डोंगर पोखरणारे मोकाट, प्रशासनाचे नियोजन कागदावरच; आणखी किती तळिये घडल्यावर सरकार जागे होणार?

**ॲक्शन प्लॅन की कागदी घोडे?**

जिल्हा प्रशासनाने यंदा दरडप्रवण गावांचे सर्वेक्षण, संवेदनशील भागांचे मॅपिंग, स्थलांतर योजना, निवारा केंद्रे आणि आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवल्याचा दावा केला आहे. मात्र, स्थानिकांच्या मते दरवर्षी हेच दावे केले जातात आणि पावसाळा संपला की सर्व योजना फाईलमध्ये बंद होतात.

धोकादायक डोंगरउतारांवर सुरू असलेली बांधकामे थांबवण्यासाठी किती कारवाई झाली? बेकायदा उत्खनन करणाऱ्यांवर किती गुन्हे दाखल झाले? वृक्षतोड रोखण्यासाठी कोणती ठोस पावले उचलली? पुनर्वसनासाठी किती कुटुंबांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाकडे नाहीत, अशी टीका होत आहे.

**'आपत्ती आली की मदत' नव्हे, 'आपत्तीपूर्व प्रतिबंध' हवा**

तज्ज्ञांच्या मते, दरडप्रवण भागांतील बांधकामांवर कठोर निर्बंध, डोंगर उत्खननावर नियंत्रण, मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड, नैसर्गिक जलमार्ग मोकळे ठेवणे आणि धोकादायक वाड्यांचे तातडीने पुनर्वसन केल्याशिवाय परिस्थिती बदलणार नाही.

जुलै आणि ऑगस्ट हे रायगडसाठी अतिवृष्टीचे महिने मानले जातात. अशा परिस्थितीत प्रशासनाच्या बैठका आणि कागदी आराखडे पुरेसे ठरणार नाहीत. कारण दरडी कोसळल्यानंतर मदतीची घोषणा करण्यापेक्षा दरडी कोसळूच नयेत यासाठी उपाययोजना करणे अधिक महत्त्वाचे आहे.

आणखी किती तळिये घडल्यावर सरकार जागे होणार? रायगडमध्ये दरडप्रवण गावांची संख्या १०३ वरून ३९२ वर पोहोचणे ही केवळ आकडेवारी नाही, तर शासन आणि प्रशासनाच्या विकास धोरणावर उभे राहिलेले गंभीर प्रश्नचिन्ह आहे. डोंगर पोखरणाऱ्यांवर कारवाई, पर्यावरणाची हानी रोखणे आणि धोक्यातील नागरिकांचे पुनर्वसन यासाठी तातडीने कठोर निर्णय घेतले नाहीत, तर रायगडला पुन्हा एका मोठ्या आपत्तीला सामोरे जावे लागू शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे. दरडींच्या सावटाखाली जगणाऱ्या हजारो कुटुंबांचा प्रश्न आता एकच आहे – प्रशासन आपत्तीची वाट पाहत आहे की ती रोखण्यासाठी खरोखर सज्ज आहे?

# वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त पाथरी येथे पत्रकारानी केले वृक्षारोपण

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे** : पाथरी/ तालुक्यातील पत्रकारांनी तहसील कार्यालय पोलिस स्टेशन पंचायत समिती परिसरात केले वृक्षारोपण महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त पाथरी शहरात पर्यावरण संवर्धनाचा प्रेरणादायी संदेश देणारा उपक्रम पाथरी मराठी पत्रकार संघटनेच्या माध्यमातून पाथरी शहरांतील विविध शासकीय कार्यालयांच्या परिसरात आज दि २ जुलै रोजी वृक्षारोपण करून पाथरी तालुक्यातील पत्रकारांनी सामाजिक बांधिलकीची जाणीव अधोरेखित केले यावेळी या वृक्षारोपण उपक्रमांत तहसीलदार नितीन गर्जे



पोलिस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे विस्तार अधिकारी रेवणवार मराठी पत्रकार संघाचे सर्व पत्रकार बांधव शासकीय अधिकारी कर्मचारी यावेळी उपस्थित होते

# सणसर सोसायटीची विक्रमी वसुली सभासदांचे चेअरमनच्या वतीने जाहीर आभार


**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : सणसर विविध कार्यकारी सोसायटीने 01 एप्रिल 2026 ते 30 जून 2026 या तीन महिन्यांच्या कालावधीत तब्बल 2 कोटी 72 लाखांची विक्रमी वसुली करून इतिहास रचला आहे. ही कामगिरी चेअरमन सौ. सिमावहिनी विक्रम निंबाळकर यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली संचालक मंडळाच्या एकजुटीने साध्य झाली सचिव संजय सपकळ व तुषार निंबाळकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, चेअरमन सौ.सिमावहिनी विक्रम निंबाळकर यांच्या कार्यकाळात सर्वाधिक वसुली झाली असून सभासदांमध्ये पुढील वर्षी लाभांश मिळणार म्हणून उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.या यशामुळे सोसायटीच्या आर्थिक स्थितीत मजबुती आली असून भविष्यातील योजनांना गती मिळणार आहे.जुने थकबाकीदार जे कर्जमाफीस पात्र नाहीत परंतु ज्यांच्यावर जप्ती आदेश नोंदले आहेत,अशा सभासदांशी संचालक मंडळाने चर्चा करून त्यांच्याकडून वसुल करण्यात आली त्यांना पुन्हा नव्याने कर्ज वाटप करून आर्थिक प्रवाहात सामील करण्यात आले आहे.नियमित कर्जफेड करणाऱ्या सभासदांना प्रोत्साहनपर अनुदान मिळणार असल्याच्या कारणाने मोठया संख्येने कर्ज भरणा केला आहे.या निर्णयामुळे सभासदांचा विश्वास वाढला असून सोसायटीच्या कार्यपद्धतीबद्दल सकारात्मकता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे 29 आणि 30 जून या दोन दिवसांत तब्बल 1 कोटी 10 लाखांची वसुली करण्यात सोसायटीला यश आले. ही आकडेवारी सोसायटीच्या कार्यक्षमतेचे द्योतक ठरत आहे पुढील 2027 या वर्षात सभासदांना लाभांश देण्यासाठी सोसायटी प्रयत्नशील असून,सभासदांनी दिलेले सहकार्य भविष्यातही कायम राहावे,अशी



अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. सभासदांच्या सहकार्यामुळे सोसायटीची आर्थिक घडी अधिक मजबूत झाली आहे. संचालक मंडळाच्या एकत्रित प्रयत्नांमुळे वसुलीची ही विक्रमी कामगिरी साध्य झाली असून,भविष्यातील योजनांसाठी ही मोठी पायरी ठरली आहे.

# गांधी चौकातील नो–पार्किंगमध्ये उभ्या वाहनांविरोधात दुर्गाबक्षसिंग ठाकूर यांचे आंदोलन



## अर्धा ते पाऊण तास रस्ता रोखून निषेध; नगरपरिषद व पोलिसांकडून तातडीच्या कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी सचिन ठाकूर** : धामणगाव रेल्वे शहरातील मध्यवर्ती गांधी चौक परिसरातील मातोश्री कॉम्प्लेक्स व HDFC बँकेसमोरील नो-पार्किंग क्षेत्रात वाहनचालकांकडून सर्रास वाहने उभी केली जात असल्याने वाहतुकीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकाराविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष दुर्गाबक्षसिंग ठाकूर यांनी आज २ जुलाई गुरुवार रोजी दुपारी पावणे दोन वाजताच्या सुमारात तीव्र निषेध नोंदवत अर्धा ते पाऊण तास रस्ता अडवून आंदोलन केले.

दुर्गाबक्षसिंग यांनी सांगितले की, गांधी चौक हा शहरातील अत्यंत वर्दळीचा भाग असून येथे दररोज नागरिक, विद्यार्थी, व्यापारी व प्रवाशांची मोठी ये-जा असते. मात्र नो-पार्किंगमध्ये बेकायदेशीरपणे उभी करण्यात येणारी वाहने वाहतुकीस अडथळा ठरत असून वारंवार कोंडी निर्माण होत आहे. यामुळे पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असून अपघाताचा धोकाही वाढला आहे. आपत्कालीन सेवांच्या वाहनांनाही या मार्गावरून जाताना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी नमूद केले. या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी दुर्गाबक्षसिंग ठाकूर यांनी गांधी चौकात अर्धा ते पाऊण तास रस्ता अडवून निषेध आंदोलन केले. यावेळी त्यांनी नो-पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या वाहनांवर तात्काळ दंडात्मक कारवाई करावी, वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात आणि अशा प्रकारच्या बेकायदेशीर पार्किंगला आळा घालावा, अशी मागणी केली.

तसेच नगरपरिषद व पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे या परिसरात नियमित कारवाई करून नो-पार्किंगचे नियम कठोरपणे लागू करावेत, अन्यथा नागरिकांच्या सहकार्याने आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दुर्गाबक्षसिंग ठाकूर यांनी दिला.

# मातंग समाज सेवक संजय इंचे यांना तात्काळ पोलीस संरक्षण दया व डॉ.लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा अवमान करणाऱ्यावर कठोर कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद टेंभुर्णी प्रतिनिधी :-अनिल ससाने :** जालना, जिल्ह्यातील जाफराबाद येथे सकल मातंग समाजाच्या वतीने जाफराबाद पोलीस स्टेशन येथे रपोलीस निरीक्षक जाधव यांना निवेदन देण्यात आली की मातंग समाज प्रबोधन परिषदचे अध्यक्ष संजय काशिनाथ इंचे यांना सोशल मीडियाच्या माध्यमातून जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्याचा गंभीर आरोप करत संजय इंचे यांना तात्काळ पोलीस संरक्षण देण्यात यावे तसेच संबंधित धमक्या देणाऱ्या वर योग्य ती कारवाई करून त्यांना तात्काळ अटक करण्यात यावी अशी मागणी सकल मातंग समाजाच्या वतीने कारवाईची मागणी करण्यात आली




अनुसूचित जातीच्या आरक्षणाच्या अ ब क ड वर्गीकरण करण्यात यावे म्हणून संपूर्ण महाराष्ट्रभर लोकशाही पद्धतीने आंदोलन मोर्चा काढण्यात येत आहे मात्र या आंदोलनाला विरोध करणाऱ्यांना सोशल मीडियाच्या माध्यमातून धमक्या देण्यास सुरुवात केली व डॉ. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे तसेच लहुजी वस्ताद साळवे यांच्या अवमान केल्याचा आरोप करण्यात आला सकल मातंग समाजाच्या म्हणण्यावरून उमेश सुतार रा. काळेगाव ता. जाफराबाद जि. जालना आणि देविदास पैठणे रा. बोरगाव ता. जाफराबाद जि.जालना यांनी फेसबुक इंस्टाग्राम व्हाट्सअप व युट्युब सारख्या सोशल मीडियाच्या माध्यमातून समाजसेवक संजय यांची यांना जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या तसेच उमेश सुतार यांनी महामानव लोकशाहीर डॉ. भाऊ साठे यांच्या बद्दल अवमान कारक शब्दाचा वापर करून सोशल मीडियावर पोस्ट व्हायरल केली असा आरोपही निवेदनामध्ये करण्यात आले संबंधित सोशल मीडियाची चौकशी करून दोषी विरुद्ध योग्य कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारा करण्यात आली या प्रकरणाची निपक्ष चौकशी करून कायद्यानुसार कठोर कारवाई करावी अशी मागणी निवेदनकर्त्याकडुन करण्यात आली

# एकचं मिशन, रेल्वे स्टेशन!"... ७० वर्षांचा वनवास संपवण्यासाठी घाटंजीत ऐतिहासिक जनआक्रोश!

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - महेश पेन्दोर :** विदर्भ आणि मराठवाड्याच्या मागासलेपणाचा डाग पुसून थेट तेलंगणा राज्याशी प्रगतीचे नाते जोडणारा यवतमाळ–घाटंजी–मांडवी–किनवट–आदिलाबाद हा रेल्वेमार्ग आता केवळ कागदावर राहू नये, यासाठी संपूर्ण घाटंजी तालुका रस्त्यावर उतरला आहे. टिपेश्वर रेल्वे जन आंदोलन समितीच्या वतीने घाटंजी येथील ऐतिहासिक जयस्तंभ चौकात ३० जून २०२६ रोजी एक अभूतपूर्व धरणे आंदोलन आणि भव्य जनजागृती रॅली काढण्यात आली. 'एकचं मिशन रेल्वे स्टेशन' आणि 'रेल्वे आमची हक्काची, लढाई जनतेची' अशा गगनभेदी घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडत नागरिकांनी आणि आंदोलकांनी शासनाचे लक्ष वेधून घेतले.




शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आलेल्या या भव्य रॅलीचे रूपांतर पुढे जयस्तंभ चौकातील शहीद स्मारकास माल्यार्पण करून एका मोठ्या जनसभेत झाले. या जनसभेत केवळ घाटंजीच नव्हे, तर मांडवी आणि किनवट भागातूनही नागरिक, व्यापारी, शेतकरी, विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने स्वयंस्फूर्तीने सहभागी झाले होते. वक्त्यांनी अत्यंत प्रभावी भाषेत मांडले की, हा रेल्वेमार्ग केवळ प्रवासाचे साधन नसून या संपूर्ण परिसराची जीवनवाहिनी आहे. या मार्गामुळे स्थानिक शेतीमालाला आणि व्यापाराला थेट तेलंगणाची बाजारपेठ मिळून मोठी आर्थिक चालना मिळेल. तसेच हजारो विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आणि रुग्णांना तातडीच्या आरोग्य सेवेसाठी अत्यंत स्वस्त व सुलभ प्रवासाचा मार्ग मोकळा होईल.

गेल्या सात दशकांपासून म्हणजेच तब्बल ७० वर्षांपासून हा रेल्वेमार्ग प्रस्तावित असूनही शासनाने याकडे सातत्याने दुर्लक्ष केले आहे, ही अत्यंत खेदजनक बाब असल्याचे आंदोलकांनी सांगितले. हा रेल्वेमार्ग विदर्भ आणि मराठवाड्याला प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणणारा मुख्य दुवा ठरणार आहे. अनेक दशकांपासून रखडलेल्या या प्रकल्पाला आता शासनाने तातडीने मंजुरी देऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी, अशी आग्रही मागणी या धरणे आंदोलनातून करण्यात आली. शेवटी, लोकभावनेचा आदर करत शासनाने यावर त्वरित पावले उचलावीत, अन्यथा भविष्यात संपूर्ण विदर्भ-मराठवाडा एकत्र येऊन यापेक्षाही तीव्र लोकआंदोलन उभारेल, असा थेट आणि कडक इशारा टिपेश्वर रेल्वे जनआंदोलन समितीच्या वतीने सरकारला देण्यात आला आहे.

# वडनेरगंगाईतील वीज टंचाई दूर करण्यासाठी स्वतंत्र फिडर बसवण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर** : दर्यापूर तालुक्यातील वडनेरगंगाई येथे वारंवार खंडित होणारा व विस्कळीत वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी गावात महावितरणमार्फत स्वतंत्र वीज फिडर बसवण्यात यावा, अशी मागणी भाजपा अनुसूचित जाती मोर्चा (मेळघाट, अमरावती ग्रामीण) जिल्हाध्यक्ष नकुल देवराव सोनटक्के यांनी राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांना निवेदनाद्वारे केली आहे.वडनेरगंगाई हे गाव महावितरणच्या ३३ केव्ही येवदा उपकेंद्राअंतर्गत येते. गेल्या काही दिवसांपासून परिसरात वारंवार वीज खंडित होणे, विद्युत तांत्रिक बिघाड तसेच विस्कळीत वीजपुरवठ्यामुळे ग्रामस्थांना



## नकुल सोनटक्के यांचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांना निवेदन; विस्कळीत वीजपुरवठ्यामुळे शेतकरी व ग्रामस्थ त्रस्त

मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सध्या खरीप हंगाम सुरू असल्याने शेतीसाठी नियमित वीजपुरवठा अत्यावश्यक आहे. मात्र, वेळेवर वीज उपलब्ध होत नसल्याने पिकांचे नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे.

शेतीबरोबरच अघोषित भारनियमनाचा फटका सामान्य नागरिक, विद्यार्थी आणि स्थानिक व्यापाऱ्यांनाही बसत असून, दैनंदिन जनजीवन विस्कळीत झाले आहे. वाढत्या तक्रारींची दखल घेत नकुल सोनटक्के यांनी खासदार डॉ. अनिल बोंडे यांची भेट घेऊन वडनेरगंगाईतील वीज समस्येबाबत सविस्तर माहिती दिली.गावाची वाढती लोकसंख्या आणि विजेची वाढती मागणी लक्षात घेता, वडनेरगंगाई येथे स्वतंत्र वीज फिडर मंजूर करून अखंडित व सुरळीत वीजपुरवठा सुनिश्चित करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

# विकसित भारत-जी रामजी' योजनेचा शुभारंभ; ग्रामीण विकास व रोजगाराला मिळणार नवी गती - आमदार विनोद अग्रवाल

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी गोंदिया** : केंद्र सरकारच्या वतीने ग्रामीण भारताच्या सर्वांगीण विकासाला आणि रोजगारनिर्मितीला नवी दिशा देण्याच्या उद्देशाने 'विकसित भारत-जी रामजी (VB-G RAM G)' योजना कायदा वर्ष २०२५ मध्ये लागू करण्यात आला. ही योजना १ जुलै २०२६ पासून संपूर्ण देशात लागू करण्यात आली असून, गोंदिया जिल्ह्यातील गोंदिया तालुक्यातील सावरी गावातून या योजनेचा प्रारंभ करण्यात आला आहे. या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण कुटुंबांना पूर्वीपेक्षा अधिक रोजगार, कृषीआधारित विकास, कौशल्य प्रशिक्षण तसेच ग्रामपंचायतींना विकासकामांसाठी अधिक संधी उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन परिसराचे आमदार विनोद अग्रवाल यांनी केले.

ग्राम सावरी येथे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित 'विकसित भारत-जी रामजी' योजनेच्या शुभारंभ कार्यक्रमात उद्घाटक म्हणून ते बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर, कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी मंदार पत्की, मुख्य कार्यकारी अधिकारी जेनित चंद्रा दोंतुला, पंचायत समिती सभापती मुनेश रहांगडाले, उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहरे, जिल्हा परिषद सदस्या दीपा चंद्रिकापुरे, पूजा अखिलेश सेठ, नंदा वाढिवा, एसडीओ चंद्रभान खंडाईत, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी विजय लोंढे, बीडीओ जितेंद्र देवरे, तहसीलदार शमशेर पठाण तसेच पंचायत समिती सदस्या शैलजा सोनवणे आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते.

योजनेविषयी माहिती देताना आमदार विनोद अग्रवाल म्हणाले की, नव्या व्यवस्थेनुसार प्रत्येक पात्र



ग्रामीण कुटुंबाला वर्षातून १२५ दिवसांच्या रोजगाराची कायदेशीर हमी मिळणार आहे. मजुरीचे पैसे ८ दिवसांच्या आत थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात डीबीटी (DBT) द्वारे जमा केले जातील. वेळेत काम उपलब्ध न झाल्यास बेरोजगारी भत्ता तसेच मजुरी देण्यात विलंब झाल्यास नुकसानभरपाईचीही तरतूद करण्यात आली आहे.

ते पुढे म्हणाले की, या योजनेअंतर्गत गावांमध्ये जलसंधारण, तलाव बांधकाम, शेतरस्ते, सिंचन सुविधांचा विस्तार, वृक्षारोपण, चारागाह विकास, ग्रामीण संपर्क मार्ग, पावसाच्या पाण्याचे संधारण, सार्वजनिक मालमत्तांची निर्मिती, शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत भवन, वाचनालय तसेच इतर पायाभूत विकासकामे हाती घेता येणार आहेत. याशिवाय ग्रामीण युवकांना कौशल्य प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगार व सूक्ष्म उद्योगांशी जोडण्यावरही विशेष भर

## ग्राम सावरी येथे 'विकसित भारत-जी रामजी' योजनेचा शुभारंभ

दिला जाणार आहे.

या योजनेच्या माध्यमातून शेततळी, बांधबंदिस्ती, सिंचन संरचना, जलसंधारण, जमीन सुधारणा तसेच कृषी उत्पादनवाढीसाठी आवश्यक कामांना प्राधान्य दिले जाणार आहे. त्यामुळे शेतीचा खर्च कमी होईल, सिंचन क्षमता वाढेल आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याची अपेक्षा आहे.

ग्रामीण मजुरांना वर्षातून १२५ दिवस रोजगार उपलब्ध होण्याबरोबरच त्यांना कौशल्य विकास व उपजीविकेवर आधारित उपक्रमांशी जोडले जाईल. त्यामुळे केवळ मजुरीपुरते मर्यादित न राहता कायमस्वरूपी उत्पन्नाच्या संधीही निर्माण होतील.

ग्रामपंचायतींना स्थानिक गरजांनुसार विकासकामांचे नियोजन व अंमलबजावणी करण्याची अधिक संधी मिळेल. गावांमध्ये टिकाऊ सार्वजनिक मालमत्तांची निर्मिती होईल, ज्यामुळे पायाभूत सुविधा आणि ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक बळकट होईल.

आमदार विनोद अग्रवाल म्हणाले की, ही योजना केवळ रोजगार उपलब्ध करून देणारी नसून ग्रामीण भागातील शेती, उपजीविका, कौशल्य विकास आणि पायाभूत सुविधा यांचा समन्वय साधून 'विकसित भारत २०४७' या उद्दिष्टाच्या पूर्ततेस गती देणारी ठरणार आहे.

यावेळी प्रशासनाचे लक्ष वेधताना आमदार विनोद अग्रवाल म्हणाले की, योजनेअंतर्गत कामे करताना 'रेशो मेंटेनन्स'कडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. सध्या चुकीच्या धोरणांमुळे अनेक कामांची देयके प्रलंबित आहेत. हा विषय आम्ही राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनास आणून दिला असून, राज्य सरकार लवकरच केंद्र सरकारशी पत्रव्यवहार करून या समस्येवर तोडगा काढेल, अशी अपेक्षा आहे. नव्या योजनेत ६० टक्के निधी केंद्र सरकारचा तर ४० टक्के निधी राज्य सरकारचा आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांना 'रेशो मेंटेनन्स'चे काटेकोर पालन करून कामे करण्याचे निर्देश द्यावेत, जेणेकरून भविष्यात कोणतीही देयकासंदर्भातील अडचण निर्माण होणार नाही.

# अर्धापूरात शिवसेनेचे युवानेते खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांचे जंगी स्वागत

**दैनिक युवक आधार**

**अर्धापूर / अरविंद पांचाळ** : शिवसेनेचे युवानेते खासदार डॉ.श्रीकांत एकनाथराव शिंदे यांचे अर्धापूर तालुक्यात शिवसेनेच्या वतिने ढोलताशांच्या गजरात फटाक्यांची आतिषबाजी करत जल्लोषात स्वागत बुधवारी 1 जुलै रोजी चोरंबा फाटा ता.अर्धापूर येथे करण्यात आले. तालुक्यातील शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवसेनेचे अर्धापूर तालुकाप्रमुख संतोष पाटील कपाटे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसैनिकांनी युवानेते खासदार डॉ.श्रीकांत एकनाथराव शिंदे हे नांदेड विमानतळावर माहूर दौऱ्यावर जाताना अर्धापूर तालुक्यात चोरंबा फाटा येथे जंगी स्वागत करण्यात आले. त्यांच्या सोबत हिंगोली लोकसभा मतदार संघाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर, हदगांव -हिमायतनगर मतदार संघाचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर, नगरसेविका सौ.मीनल पाटील, माजी नगरसेवक बाळासाहेब देशमुख तरोडेकर, शिवसेना नेते इंजि.विश्वाभर पाटील पवार हे होते.



यावेळी शिवसेनेचे अर्धापूर तालुकाप्रमुख संतोष पाटील कपाटे, अर्धापूर शहरप्रमुख सचिन येवले, चोरंबा सर्कलप्रमुख बिभिषण पाटील नरोटे, प्रकाशराव सितापराव रोडगीकर,सोनाळयाचे सरपंच अनिल घुमनर, बळवंत घोरपडे, वैभव घोरपडे, कल्याण राठोड, गजानन नरोटे,मलकार्जुन सोनटक्के, ,रोहिदास मूधळे, अविनाश शिंदे, रामजी लांडगे, ,गोविंद कोकाटे ,दत्ता पाटील कपाटे, शहाजी कपाटे, शिवानंद कपाटे,सचिन नरोटे, संदीप सोनटक्के यांच्यासह तालुक्यातील शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मिरा-भाईंदरमध्ये मुसळधार पावसाचा कहर; सखल भाग जलमय, जनजीवन विस्कळीत

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - बाळकृष्ण परब.मिरा - भाईंदर, ठाणे** : गेल्या २४ तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मिरा-भाईंदर शहरातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. शहरातील अनेक सखल भागांमध्ये पाणी साचल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. प्रमुख रस्त्यांवर वाहतूक संथ गतीने सुरू असून अनेक ठिकाणी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत.

काशीमीरा, मिरारोड, भाईंदर पूर्व व पश्चिम तसेच इतर सखल परिसरांमध्ये पाणी साचल्याने पादचारी आणि वाहनचालकांची मोठी गैरसोय झाली. काही ठिकाणी पावसाचे पाणी दुकाने व निवासी संकुलांमध्ये शिरल्याने नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

सकाळच्या कार्यालयीन वेळेत पावसाचा जोर वाढल्याने मीरारोड आणि भाईंदर येथील मुख्य रस्त्यांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. अनेक दुचाकी व चारचाकी वाहने बंद पडल्याने वाहतूक आणखी संथ झाली. पश्चिम रेल्वेच्या काही लोकल गाड्यांवरही पावसाचा परिणाम झाला असून प्रवाशांना उशिराचा सामना करावा लागत आहे.

दरम्यान, हवामान विभागाने मुंबई महानगर प्रदेशासह ठाणे, पालघर आणि आसपासच्या भागांसाठी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा कायम ठेवला असून नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, तसेच सखल भाग व समुद्रकिनाऱ्यांपासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे.

महापालिका प्रशासनाने आपत्कालीन पथके, पंपिंग यंत्रणा आणि नियंत्रण कक्ष सतर्क ठेवले असून पाणी साचलेल्या भागांमध्ये जलनिस्सारणाचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याची माहिती दिली आहे. झाडे कोसळणे, वीजपुरवठा खंडित होणे किंवा पाणी साचल्याच्या घटना तात्काळ महापालिकेच्या नियंत्रण कक्षाला कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पुढील काही दिवसही पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता असल्याने मिरा-भाईंदरकरांनी सतर्क राहून हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

सततच्या पावसामुळे शहरातील पायाभूत सुविधांची पुन्हा एकदा परीक्षा लागली असून दरवर्षीप्रमाणे जलनिस्सारण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. नागरिकांनी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली असून आगामी काही दिवस पावसाचा जोर कायम राहिल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश छायाताई भगवानराव गावंडे यांचा स्मृतिदिन व गायत्रीताई गावंडे यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव | यवतमाळ** : जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, बु. येथे आज गुरुवार, दि. २ जुलै २०२६ रोजी कै. छायाताई भगवानराव गावंडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ तसेच सौ. गायत्रीताई आशिष गावंडे यांच्या जन्मदिनानिमित्त शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपणाचा प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी वृक्षांचे संवर्धन करण्याची शपथ घेत विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

या कार्यक्रमाला गावचे सरपंच, प्रतिष्ठित नागरिक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व पदाधिकारी, तसेच महागाव पंचायत समिती आरोग्य विभागाचे वरिष्ठ कर्मचारी डॉ. ठाकरे, डॉ. निळकंठ जाधव, सहाय्यक अतुल चीकणे, सहाय्यक खापरे मॅडम, आशाताई (अंगणवाडी सेविका), शाळेचे मुख्याध्यापक, सहाय्यक शिक्षक, विद्यार्थी आणि गावातील अनेक युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी वृक्षारोपण ही काळाची गरज असून प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले. विद्यार्थ्यांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचा निर्धार व्यक्त केला.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शाळेच्या मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती तसेच ग्रामस्थांच्या सहकार्याने करण्यात आले. हा उपक्रम पर्यावरण संरक्षणासोबतच सामाजिक बांधिलकी जपणारा आणि भावी पिढीला प्रेरणा देणारा ठरला.

# मोरेगाव येथे बोर्डीकर कृषी महाविद्यालया कडून वसंतराव नाईक जयंती आणि कृषीदिन साजरा करण्यात आला

**दैनिक युवक आधार**

**मोरेगाव (विशेष प्रतिनिधी, तुकाराम नाटकर, मोरेगाव: ( सेलू) :** येथील बोर्डीकर कृषी महाविद्यालतर्फे वसंतराव नाईक यांची जयंती साजरी झाली आणि कृषी दिनानिमित्त मोरेगाव (ता.सेलू) येथे बुधवारी कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी जि.प.प्रा शाळा (मोरेगाव) या शाळेचे मुख्याध्यापक श्री. वैद्य सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समितीचे सदस्य दिलीप नाना मगर, ग्रामपंचायत सदस्य योगेश काकडे होते. कार्यक्रमात वैद्य सर त्यांचे मनोगत व्यक्त करताना म्हणाले, की एकाचे हजार दाणे करण्याची क्षमता शेतीत आहे . शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीकडे



वळले पाहिजे. शेतीत काय पिकते ,या पेक्षा काय विकते याचा विचार करून आपल्या शेतमालाचे योग्य जाहिरात केली तर शेतीला चांगले दिवस यायला वेळ लागणार नाही , असे नमूद केले.

ग्रामीण कृषी कार्यानुभव (RAWE) उपक्रमांतर्गत मोरेगाव मध्ये वसंतराव नाईक यांची जयंती आणि कृषी दिना निमित्त गावात विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढून घोषवाक्य जल्लोषात दिले. आणि त्या नंतर वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी उपक्रमास प्राचार्य डॉ. ए . ए चव्हाण, कार्यक्रम समन्वयक डॉ. एन. एन. चव्हाण , कार्यक्रमअधिकारी डॉ. ए. एस. भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आर.व्ही.मदने आणि सूत्रसंचालन एस.एस. कानकांती यांनी केले. करीके. ए. व्ही यांनी आभार मानले. या वेळी गावातील शेतकरी व कृषी महाविद्यालयातील कृषी कन्या उपस्थित होत्या.

# तरुणांच्या गळ्यातील ताईत अभिजित महाराज डुकरे; समाजसेवेच्या बळावर जिंकला जनतेचा विश्वास

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी** : नेतृत्व हे केवळ पदाने सिद्ध होत नसते, तर लोकांच्या सुख-दुःखात खंबीरपणे उभे राहण्याच्या वृत्तीने घडत असते. सारोळे खुर्दचे भूमिपुत्र अभिजित महाराज डुकरे यांनी याच विचारातून समाजसेवेचा वसा स्वीकारत अल्पावधीतच लासलगाव परिसरातील जनतेच्या मनात अढळ स्थान निर्माण केले आहे. आज ते तरुणांच्या गळ्यातील ताईत म्हणून ओळखले जात असून, त्यांच्या कार्याची चर्चा परिसरात सातत्याने होत आहे.

राजकीय पद मिळण्यापूर्वीच समाजसेवा हेच आपले ध्येय मानून त्यांनी विविध सामाजिक, धार्मिक आणि जनहिताच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. गावातील कोणत्याही कुटुंबावर संकट कोसळले, एखाद्या रुग्णाला मदतीची गरज भासली, सामाजिक प्रश्न निर्माण झाला किंवा सार्वजनिक कामासाठी लोकांना एकत्र आणण्याची वेळ आली, तर अभिजित महाराज डुकरे हे सर्वप्रथम धावून जातात. त्यामुळेच अनेकांच्या मनात त्यांनी विश्वासार्ह आणि हक्काच्या माणसाची ओळख निर्माण केली आहे.



गावातील धार्मिक उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम, शैक्षणिक उपक्रम, रक्तदान शिबिरे, सामाजिक अभियान किंवा विकासकामांबाबत जनजागृती अशा प्रत्येक उपक्रमात त्यांचा सहभाग उल्लेखनीय असतो. समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन काम करण्याची त्यांची भूमिका आणि सर्वांशी जपलेला आत्मीय संवाद हीच त्यांच्या लोकप्रियतेची मोठी कारणे मानली जातात.

मराठा आरक्षण आंदोलनाच्या काळात त्यांनी घेतलेली आक्रमक भूमिका आणि प्रभावी वक्तृत्वशैलीमुळे त्यांची ओळख अधिक व्यापक झाली. समाजाच्या प्रश्नांवर निर्भीडपणे भूमिका मांडण्याचे धाडस आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याची तयारी यामुळे विशेषतः युवकांमध्ये त्यांच्याविषयी आकर्षण निर्माण झाले. त्यांच्या भाषणातून केवळ राजकीय भूमिका नव्हे, तर समाजाविषयीची तळमळ आणि परिवर्तनाची इच्छा स्पष्टपणे दिसून येते.

वयाने तरुण असले तरी गावातील वाद-विवाद, तंटे आणि गैरसमज संवादातून मिटविण्यासाठी ते सातत्याने पुढाकार घेतात. समाजात ऐक्य, बंधुभाव आणि सलोखा टिकवून ठेवण्यासाठी ते प्रयत्नशील असतात. त्यामुळेच गावातील ज्येष्ठ मंडळींसह युवकांमध्येही त्यांच्याबद्दल आदराची भावना आहे.

सध्या शिंदे यांच्या शिवसेनेचे तालुकाप्रमुख म्हणून कार्यरत असलेले अभिजित महाराज डुकरे हे संघटन मजबूत करण्याबरोबरच जनतेचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत. लोकांशी कायम संपर्कात राहणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि शक्य तेवढ्या तत्परतेने त्या सोडविण्याचा प्रयत्न करणे ही त्यांची कार्यशैली ठरली आहे.

त्यांच्या वाढत्या जनाधारामुळे आणि समाजातील स्वीकारार्हतेमुळे आगामी काळात ग्रामपंचायत, पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणात ते महत्त्वाची भूमिका बजावतील, अशी चर्चा लासलगाव परिसरात रंगू लागली आहे. समाजकारणातून राजकारणाकडे वाटचाल करणाऱ्या या युवा नेतृत्वाकडून परिसरातील नागरिकांच्या अपेक्षाही दिवसेंदिवस वाढत आहेत.

समाजसेवा, जनसंपर्क, संघर्षाची तयारी आणि सर्वसामान्यांप्रती असलेली आत्मीयता या बळावर अभिजित महाराज डुकरे यांनी जनतेचा विश्वास जिंकला असून, त्यांच्या राजकीय आणि सामाजिक प्रवासाकडे आता संपूर्ण लासलगाव परिसराचे लक्ष लागले आहे.

# पालोद येथे वृक्षदिंडी व वृक्षारोपण; घरकुल लाभार्थ्यांना मार्गदर्शन




**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : ग्रामपंचायत पालोद (ता. सिल्लोड) येथे दिनांक ०२/०७/२०२६ रोजी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिन्नू आणि गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत वृक्ष लागवड करण्यात आली असून, सहाय्यक गटविकास अधिकारी आशिष म्हस्के यांच्या हस्ते वृक्ष लागवड संपन्न झाली.वृक्षारोपणासोबतच यावेळी ग्रामपंचायत पालोद अंतर्गत घरकुल योजनेचा आढावा घेण्यात आला. यामध्ये घरकुल लाभार्थ्यांच्या भेटी घेऊन त्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमास कृषी अधिकारी सूर्यवंशी, कृषी विस्तार अधिकारी बनसोड, केंद्रप्रमुख सुरडकर, मुख्याध्यापक सपकाळ, ग्रामपंचायत अधिकारी जयदीप सुरुशे, ग्रामपंचायत कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दर्यापूर तालुक्यातील येवदा येथील अवैध प्लॉटिंगची तहसीलदारांकडून पाहणी

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी, दर्यापूर** : दर्यापूर येवदा गावात सुरू असलेल्या कथित अवैध, नियमबाह्य व विनापरवाना प्लॉटिंग प्रकरणाची महसूल प्रशासनाने गंभीर दखल घेत विविध ठिकाणी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली. दर्यापूरचे तहसीलदार रवींद्रकुमार कानडजे यांच्या नेतृत्वाखाली ही पाहणी करण्यात आली. यामुळे परिसरातील प्लॉटिंग प्रकरण पुन्हा चर्चेत आले असून पुढील कारवाईकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

गावातील नागरिकांकडून महसूल प्रशासनाकडे अवैध प्लॉटिंगबाबत सातत्याने तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. तसेच नियमबाह्य पद्धतीने प्लॉटिंग सुरू असल्याबाबत विविध स्तरांवर आक्षेप नोंदविण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने संबंधित ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करण्याचा निर्णय घेतला.




तहसीलदार रवींद्रकुमार कानडजे, नायब तहसीलदार प्रवीण जमदाडे, मंडळ अधिकारी अरविंद पवार तसेच येवदा भाग क्रमांक १, २ व ३ चे तलाठी यांच्या उपस्थितीत विविध प्लॉटिंग साईटची तपासणी करण्यात आली. यावेळी नदी व नाल्यालगत उभारण्यात आलेल्या संरक्षण भिंतीचीही पाहणी करण्यात आली. संबंधित बांधकामे व विकासकामे नियमांनुसार आहेत की नाहीत, याचा प्राथमिक आढावा घेण्यात आला.

महसूल प्रशासनाने एकूण सात प्लॉटिंग साईटची पाहणी केली. मात्र संबंधित विकासकांपैकी केवळ तीन विकासक उपस्थित राहिले. उर्वरित चार विकासकांना सूचना देण्यात आल्या असूनही ते पाहणीदरम्यान अनुपस्थित असल्याचे समोर आले.

## ■ विकासकांकडे कागदपत्रांबाबत प्रश्नचिन्ह
## ■ विभागीय आयुक्त कार्यालयातून जिल्हाधिकाऱ्यांना अहवालासाठी पत्र

**"गावातील नागरिकांच्या तक्रारीच्या अनुषंगाने आम्ही स्थळ परीक्षण केले आहे. संबंधितांविरुद्ध योग्य ती कार्यवाही करण्यात येईल तसेच आवश्यक पत्रव्यवहारही केला जाईल."**
**— रवींद्रकुमार कानडजे, तहसीलदार, दर्यापूर**

पाहणीदरम्यान काही विकासकांकडे आवश्यक परवानग्या, मंजुरीपत्रे व इतर संबंधित कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आल्याची माहिती आहे. काही ठिकाणी कोणतीही कागदपत्रे सादर करण्यात आली नसल्याचेही सांगण्यात येत आहे.

त्यामुळे या प्रकरणात पुढे कोणती कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून येवदा परिसरात मोठ्या प्रमाणावर विनापरवाना व नियमबाह्य प्लॉटिंग सुरू असल्याच्या तक्रारी होत होत्या.

त्यामुळे भविष्यात कायदेशीर अडचणी निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करत नागरिकांनी प्रशासनाकडे कारवाईची मागणी केली होती.

दरम्यान, विभागीय आयुक्त कार्यालयातून या प्रकरणाचा अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठविण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

महसूल प्रशासनाकडून पाहणीचा सविस्तर अहवाल तयार करण्यात येणार असून त्यानंतर पुढील कार्यवाहीबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे.

**ठळक मुद्दे**

येवदा येथील ७ प्लॉटिंग साईटची महसूल प्रशासनाकडून पाहणी

केवळ ३ विकासक उपस्थित; ४ विकासक अनुपस्थित

आवश्यक परवानग्या व कागदपत्रांबाबत प्रश्नचिन्ह

नदी-नाल्यालगतच्या संरक्षण भिंतीचीही तपासणी

विभागीय आयुक्त कार्यालयातून जिल्हाधिकाऱ्यांना अहवालासाठी पत्र

नागरिकांच्या तक्रारीनंतर प्रशासनाची कारवाई

---

# मनसेचे देवणी तालुकाप्रमुख सोमनाथ कलशेट्टे अभिष्टचिंतन सोहळा संगमेश्वर मंगल कार्यालयात उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे देवणी तालुकाप्रमुख सोमनाथ कलशेट्टे यांच्या ४० व्या वाढदिवसानिमित्त मंगळवार, दि. ३० जून २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता संगमेश्वर मंगल कार्यालय, देवणी (जि. लातूर) येथे ओम गणेश मंडळाचे पदाधिकारी व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, मित्रपरिवार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना राज्यात स्थापन झाल्यापासून राज ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन सोमनाथ कलशेट्टे यांनी देवणी तालुक्यात मनसेचे संघटन उभे करण्यासाठी सातत्याने कार्य केले आहे.

त्यांचे जिवलग सहकारी कै. विकास कोतवाल यांच्या डिसेंबर २०१४ मधील अपघाती निधनानंतर तालुक्यात मनसेमध्ये निर्माण झालेली पोकळी निष्ठा, चिकाटी आणि कार्यकर्त्यांना सोबत घेऊन भरून काढण्याचे काम त्यांनी केले. संघटनवाढ, जनसंपर्क आणि सामाजिक उपक्रमांमधील त्यांच्या योगदानाचा यावेळी उपस्थितांनी गौरव केला.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश मनसुरे आभार प्रदर्शन अटल धनुरे याने केले. यावेळी अमोल जीवने, परम जीवने, दीपक स्वामी, बिरादार (आंबेगाव), अनिल कांबळे, प्रशांत कांबळे, राज जीवने, महेश धनुरे, लक्ष्मण रणदिवे, संतोष जीवने, निलेश धनुरे, वसंत पापणे, देवणी येथील तलाठी कांबळे, सेवानिवृत्त शिक्षक शेख राजकुमार कलशेट्टे. अमित मानकरी. ओम जीवने. सोमनाथ लुले. चंद्रकांत मसगले . मयूर पटणे. गोविंद मोदी. संदीप मंगलगे. विद्यासागर धनुरे. राजकुमार चिद्रेवार. आशिष धनुरे . किरण कुलकर्णी . मुर्के परिवारासह विविध क्षेत्रांतील मान्यवर व असंख्य मित्रपरिवार उपस्थित होता. उत्साहपूर्ण वातावरणात अभिष्टचिंतन सोहळा संपन्न झाला.

---

# TLP हे २५ राज्यांतील आदिवासी तरुणांचे मिलनस्थळ; नागपूरच्या प्राजक्ता ताराम यांनी गोंड संस्कृतीचे केले प्रतिनिधित्व

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपुर** : बेगळुरू येथील 'द स्कूल ऑफ विस्डम' (The School of Wisdom) मध्ये २१ जून ते २८ जून २०२६ या कालावधीत 'ट्रायबल लीडरशिप प्रोग्राम' (TLP) आयोजित करण्यात आला होता. या प्रतिष्ठित कार्यक्रमात देशभरातील २५ राज्यांमधून निवडलेल्या आदिवासी युवा प्रतिनिधींनी सहभाग घेतला. यात महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, झारखंड, ओडिशा, तेलंगणा, कर्नाटक, राजस्थान, आसाम, मेघालय, मणिपूर, मिझोराम, नागालँड, त्रिपुरा आणि अरुणाचल प्रदेश यांसारख्या विविध राज्यांतील सहभागींचा समावेश होता.

महाराष्ट्रातील नागपूर येथील प्राजक्ता ताराम यांनी या कार्यक्रमात गोंड (गोंडी) जमातीचे प्रतिनिधित्व केले आणि आपली संस्कृती, परंपरा व आदिवासी ओळख सादर केली. संपूर्ण कार्यक्रमादरम्यान, देशभरातील सहभागींनी आपापल्या आदिवासी संस्कृती, रीतिरिवाज आणि सामाजिक अनुभवांची देवाणघेवाण केली, ज्यामुळे प्रत्येकाला एकमेकांकडून शिकण्याची आणि समजून घेण्याची संधी मिळाली.



आठ दिवस चाललेल्या या प्रशिक्षण कार्यक्रमात तज्ज्ञांनी सहभागींना नेतृत्व विकास, समुदाय सक्षमीकरण, प्रभावी संवाद, सांघिक कार्य (teamwork), सामाजिक बदल, निर्णयक्षमता आणि समाजातील सकारात्मक नेतृत्वाची भूमिका यांसारख्या विषयांवर प्रशिक्षण दिले. तसेच, विविध गट-उपक्रम, सांस्कृतिक सादरीकरणे आणि परस्पर संवादात्मक सत्रांच्या माध्यमातून आदिवासी तरुणांमधील परस्पर सहकार्य व नेतृत्व क्षमता बळकट करण्यावर विशेष भर देण्यात आला.

प्राजक्ता ताराम यांनी या कार्यक्रमाचे वर्णन एक अविस्मरणीय आणि प्रेरणादायी अनुभव असे केले. देशभरातील आदिवासी तरुणांसोबत शिकण्याची आणि आपल्या गोंड समाजाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाल्य

---

# कृषी महाविद्यालय कांचनवाडी यांच्या वतीने पोरगाव येथे महाराष्ट्र कृषी दिन मोठ्या उत्सव साजरा

**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद टेंभुर्णी प्रतिनिधी:- अनिल ससाने** : छत्रपती संभाजीनगर पैठण तालुक्यातील पोरगाव येथे वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ सलग्न छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचालित कृषी महाविद्यालय कांचनवाडी छत्रपती संभाजी नगर येथील चतुर्थ वर्षातील विद्यार्थ्यांनी ग्रामीण जागरूकना कार्य अनुभव आणि कृषी औद्योगिक संलग्न कार्यक्रम या अंतर्गत पोरगाव येथे वसंतराव नाईक यांच्या प्रथमेश पुष्पहार अर्पण करून व वृक्षारोपण करून महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला हा कार्यक्रम पोरगाव येथील जिल्हा परिषद शाळेत घेण्यात आला त्यावेळी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक बाबुराव खांबड व गावचे सरपंच प्रभाकर निळ व कृषी महाविद्यालयाचे प्राध्यापिका रूपाली कोरडे यांनी कृषी दिन व वृक्षरोपणाचे महत्त्व आणि मार्गदर्शन केले कृषी दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आणि भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले

स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना उत्कृष्ट सहभाग नोंदवून आपली सर्जनशीलतेचे वकृत्व कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले कार्यक्रमाच्या शेवटी स्पर्धेतील योजनेचे बक्षीस देऊन गौरव करण्यात आला



छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख आणि कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन पाटील व उपप्राचार्य डॉ. अतुल भोडवे महाविद्यालयाच्या प्राध्यापिका रूपाली कोरडे व कार्यक्रमाचे समन्वयक राजू सिंग डोंगरजाळ यांनी मार्गदर्शन केले गावातील ग्रामस्थांच्या मदतीने वृक्षरोपण करण्यात आले त्यावेळी गावातील सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते आणि गावाला लाभलेले कृषिद्र कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी जयदीप गायकवाड ,प्रमोद क्षीसागर ,अर्पित शाहू, दर्शन दिगेकर ,आकांक्षा ढगे वैष्णवी बनसोडे, अश्विनी बोबडे श्रावणी कापे, चैताली कापडे प्रियांका दाभाडे, श्रद्धा औताडे, साक्षी गुल्हाटे, नागेश्वरी फुलारी वैष्णवी डोळस, स्वाती देवरे, व इत्यादी विद्यार्थीनी अतिशय चांगली कामगिरी बजावली

---

# २३२ कोटींच्या रस्त्यावर ठेकेदाराची मनमानी; 'पुढारी सुस्त, जनता त्रस्त'

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी** : राज्य मार्ग क्रमांक ७ अंतर्गत सुरू असलेल्या भरवस फाटा–कोळपेवाडी–देर्डे फाटा या तब्बल २३२ कोटी रुपयांच्या रस्ते प्रकल्पात गंभीर अनियमितता उघडकीस आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. सातमोऱ्या ते भरवस फाटा या टप्प्यावर आवश्यक खोदकाम न करताच निकृष्ट दर्जाची खडी टाकून रस्त्याचे काम सुरू असल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. विशेष म्हणजे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी कामातील त्रुटी निदर्शनास आणून स्पष्ट सूचना दिल्यानंतरही ठेकेदाराने त्या धाब्यावर बसवत रात्रीच पुन्हा निकृष्ट खडी पसरवल्याचा आरोप होत आहे.

देर्डे फाट्याकडून सातमोऱ्यापर्यंतच्या कोपरगाव हद्दीत जुना रस्ता पूर्णपणे खोदून नवीन माती व मुरूम टाकत भक्कम पाया तयार करण्यात आला. मात्र, निफाड हद्दीतील सातमोऱ्या ते भरवस फाटा या भागात खोदकामालाच फाटा देत थेट खडी टाकण्यात आली. वापरण्यात आलेल्या खडीत मोठ्या प्रमाणात दगडाचा चुरा असल्याने कामाच्या दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नागरिकांच्या तक्रारीनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता तुळशीराम दहिफळे यांनी घटनास्थळी पाहणी करून नियमानुसार संपूर्ण खोदकाम करून भक्कम पाया तयार करण्याचे तसेच निकृष्ट खडीऐवजी दर्जेदार खडी वापरण्याचे स्पष्ट आदेश दिले. मात्र, या आदेशांकडे दुर्लक्ष करत ठेकेदाराने रात्रीच पुन्हा काम सुरू केल्याने अधिकाऱ्यांच्या

## अधिकाऱ्यांच्या आदेशालाही ठेंगा; खोदकामाविना निकृष्ट खडी टाकून रातोरात काम उरकण्याचा आरोप

आदेशालाही उघडपणे आव्हान दिले जात असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.

दरम्यान, सातमोऱ्या ते देवगाव फाटा हा रस्ता गेल्या दोन-तीन महिन्यांपासून खोदलेल्या अवस्थेत असल्याने नागरिक धुळीने हैराण झाले आहेत. पावसाळ्यात चिखलामुळे वाहनधारकांची मोठी गैरसोय होत आहे. तरीही कामाचा दर्जा सुधारण्याऐवजी घाईघाईने काम पूर्ण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

'पुढारी सुस्त, जनता त्रस्त'

रस्त्याच्या कामाबाबत वारंवार तक्रारी होऊनही निफाड तालुक्यातील लोकप्रतिनिधी या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष करत असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे "पुढारी सुस्त, ठेकेदार मस्त आणि जनता त्रस्त" अशी संतप्त प्रतिक्रिया परिसरातून उमटत आहे.

निकृष्ट कामाची तातडीने उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई करावी, अन्यथा तीव्र लोकआंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

---

# रासनी करत असलेल्या शेतमजुर व बैलाचा महावितरणच्या हलगर्जीपणा मुळे शॉक लागुन मृत्यु

**दैनिक युवक आधार**

**उमरी वार्ताहर रुपेशकुमार श्रीरामवार** : उमरी तालुक्यातील मौजे निमटेक येथील शेतमजुर हे शेतात रासनी करतांना शेतात असलेल्या विद्युत खांबाच्या तनाव्याला स्पर्श झाल्याने शेतमजुरासह बैलाचा जागीच मुर्त्यु झाल्याची दुर्दैवी घटणा निमटेक येथे दि.२ जुलै रोजी सकाळी १० वाजता घडली. या घटनेमुळे निमटेकसह परिसरात महावितरण कंपनी विरोधात तिर्व संताप व्यक्त होत आहे.

निमटेक येथील शेतकरी लक्ष्मण विठ्ठल चंदापुरे यांच्या शेतात मजुरीने पेरणी करत असलेला शेख असलम



जलालसाब वय (२२) वर्षे रा.निमटेक ता.उमरी जि.नांदेड हा शेतमजुर शेतात रासनी करत असतांना शेतातील विद्युत खांबातील तनाव्यात विद्युत प्रवाह उतरल्याने रासनी करत असलेला शेख असलम व बैलाचा विद्युत तारेचा धक्का लागल्याने जागीच दुर्दैवी मुर्त्यु झाला या घटनेची माहिती मिळताच गावातील नागरिक धावुन आले व महावितरण कंपनी व बेजबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्या विरूद्ध मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केल्या शिवाय मृतदेह हलविणार नाही असा पवित्रा नागरिकांनी घेतल्याने या ठिकाणी उमरी पोलिस निरिक्षक जयप्रकाश गुट्टे, तालुका कृषी अधिकारी शिवाजी मिरासे, महाविरणचे शाखा अभियंता जगदाळे, तलाठी ,पोलिस पाटील यांनी घटनास्थळी भेट देवून योग्य न्याय देण्याचे आश्वासन दिल्याने मृतदेह शवविच्छेदनासाठी उमरी ग्रामीण रूग्णालयात आणुन श्वविच्छेदन करुन प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले आहे .

पोलिस निरिक्षक जयप्रकाश गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरिक्षक महेंद्रकुमार पुपुलवाड, बिट अंमलदार सुनील कानगुलवार,सिदने हे पुढील तपास करीत आहेत.

---

# एरंडोल नगरपरिषदेच्या उपाध्यक्षपदी श्री. कृष्णा प्रल्हाद ओतारी यांची बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी** : आज, दिनांक १ जुलै २०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता नगरपरिषद सभागृहात विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. या निवडणुकीत श्री. कृष्णा प्रल्हाद ओतारी यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.या निवडणूक प्रक्रियेसाठी पिठासीन अधिकारी म्हणून एरंडोलचे तहसीलदार श्री. गोपाळ पाटील यांनी काम पाहिले. याप्रसंगी व्यासपीठावर एरंडोलचे लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. श्री. नरेंद्र ठाकूर आणि मुख्याधिकारी अमोल बागुल हे प्रामुख्याने उपस्थित होते. पिठासीन अधिकारी यांनी कृष्णा प्रल्हाद ओतारी यांच्या अर्जाची कायदेशीर पडताळणी करून तो वैध ठरवला. इतर कोणताही अर्ज न आल्यामुळे त्यांची बिनविरोध निवड घोषित करण्यात आली.



श्री. कृष्णाभाऊ ओतारी यांच्या निवडीमागे मा.आमदार ॲड.अमोलदादा पाटील यांचे मार्गदर्शन व आशीर्वाद तसेच प्रा. मनोज भाऊ पाटील यांच्या प्रयत्नांचे मोलाचे योगदान असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. एरंडोल नगरपालिकेच्या एकूण 25 नगरसेवकांपैकी 21 नगरसेवक या विशेष निवड सभेला उपस्थित होते.

उपस्थित मान्यवर व नगरसेवक याप्रसंगी शिवसेना गटनेते मनोज पाटील, अनिल महाजन, रवींद्र महाजन, डॉ. गीतांजली ठाकूर, आरती महाजन, शारदा मराठे, कमलबाई पाटील, इम्रान अली पठाण, नरेंद्र पाटील, अमोल तबोली, पौर्णिमा देवरे सुनिता माळी प्रशांत महाजन सत्यभामाबाई पाटील भारती गुजर नितेश चौधरी मनकरनाबाई चौधरी पठाण नयमखा कागजी नजमाबी सय्यद आदी नगरसेवक व नगरसेविका उपस्थित होते.

कृष्णा प्रल्हाद ओतारी यांची उपाध्यक्षपदी निवड जाहीर होताच सभागृहात एकच जल्लोष करण्यात आला. पिठासीन अधिकारी व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नवनियुक्त उपाध्यक्षांचा शाल आणि पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला.या उपाध्यक्ष निवडणुकीसाठी हितेश जोगी प्रशासकीय अधिकारी, लक्ष्मण पाटील सभा लिपिक, महेंद्र पाटील यांनी परिश्रम घेतले.

# शेतकरी कर्जमुक्ती म्हणजे काय भाऊ?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच सर्वात मोठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' जाहीर केली आहे. शेतकरी बांधवाना कर्जमुक्ती देण्याचा हा ऐतिहासिक महानिर्णय असून यामुळे शेतकरी राजा आणि कृषी क्षेत्र अधिक सकक्षम होईल.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर हे कृषक प्रशासक रयतेच्या कल्याणासाठी आयुष वेचणाऱ्या लोकाभिमुख शासन होत्या. शेती, सिंचन, जलसंधारण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही आदर्श मानले जाते. म्हणूनच त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाशी निगडीत या महत्वपुर्ण योजनेस 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' हे नाव देवून शासनाने त्यांच्या कार्याला अभिवादन केले आहे.

**कर्जमुक्ती योजना काय आहे**

2017 मध्ये दीड लाख रुपयांपर्यंत, तर 2019 मध्ये दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात आली होती. यावेळीही दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती देण्यात येत आहे. अल्पमुदतीची थकीत पीककर्जे, तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जाचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे.

यावेळी एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे आणि तो म्हणजे पूर्वी दोन लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा थोडी जास्त रक्कम कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता, म्हणजे एकाद्या शेतकऱ्याचे दोन लाख दहा हजार कर्ज असेल तर तो शेतकरी अपात्र होता. आता मात्र अशा शेतकऱ्यांनी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम शासन भरणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज मिळण्याचा मार्ग सुकर होणार आहे. तसेच यामध्ये जमीन धारणेची अट नाही.

याशिवाय नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी 50 हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. कर्जफेडीची शिस्त टिकवून ठेवण्यासाठी आणि प्रामाणिक कर्जदारांना प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

**एकवेळ समझोता योजना**

१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२६ अखेर उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जखात्यांची एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्ज खात्यांची मुद्दल व व्याजासह ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली एकत्रित थकबाकीची रक्कम दोन लाखांपेक्षा जास्त असेल अशा शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील रक्कम भरल्यानंतर त्यांना लाभ मिळणार आहे. त्यामुळे प्रत्यक्षात शेतकऱ्यांना जी थकित रक्कम आहे त्यापेक्षा कमी रक्कम भरावी लागेल. विशेष म्हणजे अशा शेतकऱ्यांना त्यांच्या हिश्श्याची दोन लाखांवरील थकित रक्कम भरण्यासाठी 31 मार्च 2027 पर्यंत कालावधी दिला जाणार आहे.

**प्रोत्साहनपर लाभ**

नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या योजनेअंतर्गत २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ पैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन ३० जून पूर्वी किंवा बँकेच्या नियमानुसार विहित वेळेत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति शेतकरी रु. ५० हजार पर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. यासाठी २०२५-२६ व २०२६-२७ या आर्थिक वर्षांतील अल्पमुदत पीक कर्जाचीही वेळेत परतफेड करणे आवश्यक राहील.

तसेच, 2023-24 अथवा 2024-25 या वर्षात पूर्णत: परतफेड केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची रक्कम 50 हजारांपेक्षा कमी असल्यास अशा शेतकऱ्यांना त्यांनी 2023-24 अथवा 2024-25 या वर्षात अल्प मुदत पीक कर्जाच्या मुद्दल व व्याजासह प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम किंवा 5 हजार प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.

**नियमित परतफेड करणाऱ्यांना मोठा दिलासा**

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, 2019 मधील योजनेच्या लाभार्थ्यांसाठी महत्वाची तरतूद यामध्ये करण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांनी 1 एप्रिल 2019 ते 31 मार्च 2025 पर्यंत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचे केलेले पुर्नगठन/ फेरपुर्नगठन थकीत हप्त्याची 30 सप्टेंबर 2025 पर्यंत रक्कम रु. 50 हजार पर्यंत असल्यास पूर्ण कर्जमुक्ती, आणि रु.50 हजारांपेक्षा जास्त असल्यास एकवेळ समझोता (OTS) योजनेचा लाभ मिळणार आणि रक्कम भरण्याची मुदत 31 मार्च 2027 असणार आहे.

**योजनेचे निकष**

पात्र शेतकऱ्यांना मुद्दल आणि व्याजासह प्रति शेतकरी २ लाख रुपयांपर्यंत थेट कर्जमुक्ती.

१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जासाठी लागू.

३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेल्या कर्जाचा समावेश.

३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या कर्जाचा समावेश.

**जमीन धारणेची अट नाही**

पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात पुनर्गठन/फेरपुनर्गठन केलेल्या थकीत हप्त्यांनाही २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती.

२ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असल्यास अतिरिक्त रक्कम ३१ मार्च २०२७ पर्यंत संबंधित बँकेत जमा केल्यास कर्जमुक्तीचा लाभ.

शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करणे अनिवार्य आहे.

राष्ट्रीयकृत, खाजगी, ग्रामीण, जिल्हा बँका व प्रा. कृषी पतपुरवठा संस्थांच्या कर्जाना लागू.

**कोण पात्र असणार नाहीत:**

विद्यमान किंवा माजी मंत्री, राज्यमंत्री, लोकसभा व राज्यसभा सदस्य, विधानसभा व विधान परिषद सदस्य तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतील (महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायतीचे विद्यमान किंवा माजी सदस्य.

केंद्र किंवा राज्य शासनातील असे अधिकारी व कर्मचारी, ज्यांचे एकत्रित मासिक वेतन रु.25 हजार पेक्षा अधिक आहे.

राज्य सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (उदा. महावितरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ इ.) तसेच अनुदानित संस्थांतील रु. 25,000 पेक्षा अधिक मासिक वेतन असलेले अधिकारी व कर्मचारी. शेतीव्यतिरिक्तच्या उत्पन्नावर आयकर भरणाऱ्या व्यक्ती, निवृत्तीवेतनधारक व्यक्ती ज्यांचे 25 हजार पेक्षा अधिकमासिक निवृत्तीवेतन घेणारे निवृत्तीवेतनधारक (मात्र माजी सैनिकांना हा अपवाद लागू राहील).

कृषी उत्पन्न बाजार समित्या, सहकारी साखर कारखाने, सहकारी सुतगिरण्या, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड तसेच सहकारी दूध संघ यातील अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळाचे सदस्य, अधिकारी व रु. 25 हजार पेक्षा अधिक एकत्रित वेतन असलेले कर्मचारी. मात्र, सहकारी साखर कारखान्यांतील हंगामी कामगार या अपात्रतेतून वगळण्यात आले असून ते योजनेसाठी पात्र राहतील.या कर्जमुक्ती योजनेची संपूर्ण अंमलबजावणी प्रक्रिया ऑनलाईन आणि पारदर्शक असून या योजनेचा लाभ सुमारे 56 लाख शेतकऱ्यांना मिळणार असून सुमारे 36 हजार 500 कोटी रुपयांचे वितरण करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना ठरणार आहे.

**संचालक कार्यालय, नागपूर.**

# चला करून घेऊ कर्जमुक्तीबाबतचे शंकानिरसन

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत कर्जमाफी, एकवेळ समझोता (OTS), नियमित कर्जफेड करणाऱ्यांसाठी प्रोत्साहनपर लाभ, पात्रता, अपात्रता, अर्ज प्रक्रिया, ॲग्रीस्टॅक नोंदणी, तक्रार निवारण आदि विविध बाबींविषयी शेतकऱ्यांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. या सर्व प्रश्नांची अधिकृत व सोप्या भाषेतील उत्तरे एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावीत, या उद्देशाने ही प्रश्नोत्तरे तयार करण्यात आली आहेत. यामुळे शेतकऱ्यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक माहिती सहज समजून घेता येईल आणि गैरसमजांनाही आळा बसेल…

**कर्जमुक्तीबाबत शेतकऱ्यांना पडणारे प्रश्न आणि त्याची उत्तरे**

**१. या कर्जमुक्ती योजेचे नाव काय आहे आणि ती कोणासाठी आहे?**

उत्तर: या योजनेचे नाव 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, 2026' असे आहे. ही योजना राज्यातील थकीत कर्ज असलेल्या आणि नियमित कर्ज भरणाऱ्या अशा दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांसाठी आहे.

**२. या योजनेत माझे किती रुपयांपर्यंतचे कर्ज माफ होईल?**

उत्तर: तुमच्या पीक कर्जाची मुद्दल आणि व्याज मिळून जास्तीत जास्त 2 लाख रुपयांपर्यंतची थकबाकी या योजनेत थेट माफ केली जाईल.

**३. कोणत्या काळातील पीक कर्जाला ही माफी मिळेल?**

उत्तर: तुम्ही 1 एप्रिल 2019 ते 31 मार्च 2025या काळात घेतलेले अल्पमुदत पीक कर्ज जर 30 सप्टेंबर 2025 रोजी थकीत असेल आणि 31 मार्च 2026 पर्यंत तुम्ही ते भरले नसेल, तर त्या कर्जाला ही माफी मिळेल.

**४. माझ्यावर 2 लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असेल, तर मला लाभ मिळेल का?**

उत्तर: होय, नक्की मिळेल. याला 'एकवेळ समझोता' (OTS) योजना म्हटले आहे. जर तुमचे कर्ज 2 लाखांपेक्षा जास्त असेल, तर तुम्हाला 2 लाखांच्या वरची अतिरिक्त रक्कम प्रथम बँकेत भरावी लागेल. ती अतिरिक्त रक्कम भरल्यावर शासन तुमच्या खात्यात 2 लाख रुपये जमा करेल.

**५. दोन लाखांवरील वरची रक्कम भरण्यासाठी माझ्याकडे लगेच पैसे नसतील तर मला किती वेळ मिळेल?**

उत्तर: काळजी करू नका, शासनाने शेतकऱ्यांना त्यांच्या वाट्याची (दोन लाखांवरील) रक्कम बँकेत जमा करण्यासाठी 31 मार्च 2027 पर्यंतची मोठी मुदत दिली आहे.

**६. मी माझे पीक कर्ज वेळेवर आणि नियमित भरले आहे, मला काय फायदा मिळेल?**

उत्तर: शासनाने प्रामाणिकपणे कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांचाही विचार केला आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून 50 हजार रुपयांपर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ दिला जाईल.

**७. प्रोत्साहनपर लाभासाठी कोणत्या वर्षाची कर्जफेड पाहिली जाईल?**

उत्तर: सन २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत तुम्ही पीक कर्ज घेऊन ते ३० जून पूर्वी किंवा बँकेच्या नियमानुसार वेळेत पूर्ण भरले असेल, तर तुम्ही ५० हजारांच्या लाभासाठी पात्र ठराल. (मात्र तुम्हाला २०२५-२६ आणि २०२६-२७ ची कर्जेही वेळेत भरावी लागतील).

**८. मी नियमित कर्ज भरले आहे, पण माझे कर्ज ५० हजार रुपयांपेक्षा कमी होते, तर मला किती रक्कम मिळेल?**

उत्तर: तुमचे कर्ज ५० हजारांपेक्षा कमी असल्यास, तुम्ही जेवढी मुद्दल व व्याजाची रक्कम बँकेत भरली आहे तेवढीच रक्कम किंवा किमान ५,००० रुपये तुम्हाला प्रोत्साहन म्हणून मिळतील.

**९. मला २०१९ च्या (महात्मा जोतीराव फुले) कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळाला होता, आता मला काही लाभ मिळेल का?**

उत्तर: होय. जर तुमच्यावर नव्याने १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ मधील कर्जाची ५० हजार रुपयांपर्यंतची थकबाकी (३० सप्टेंबर २०२५ अखेर) असेल तर ती पूर्ण माफ होईल. जर ही थकबाकी ५० हजारांहून जास्त असेल, तर ५० हजारांच्या वरची रक्कम तुम्ही भरल्यावर शासन तुम्हाला एकवेळ समझोता (OTS) अंतर्गत लाभ देईल आणि यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत असेल.

**१०. दुष्काळामुळे माझ्या पीक कर्जाचे 'मध्यम मुदतीच्या कर्जात' पुनर्गठन झाले आहे, त्याला माफी मिळेल का?**

उत्तर: होय, तुमच्या पुनर्गठीत आणि फेरपुनर्गठीत कर्जाच्या थकीत हप्त्यांना सुद्धा या योजनेत २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी मिळेल.

**११. कर्जमाफीचा लाभ मिळण्यासाठी किती एकर जमीन असावी अशी काही अट आहे का?**

उत्तर: अजिबात नाही. या योजनेत जमीन धारणेचे क्षेत्र कितीही असले तरी (कोणतीही अट न ठेवता) शेतकऱ्यांना लाभ दिला जाणार आहे.

**१२. कर्जमाफी मिळवण्यासाठी मला कुठे अर्ज करावा लागेल का?**

उत्तर: नाही, तुम्हाला कुठेही लेखी अर्ज करायची गरज नाही. ही योजना पूर्णपणे ऑनलाईन आणि पारदर्शक आहे. बँका स्वतः तुमची माहिती शासनाच्या पोर्टलवर देतील.

**१३. या योजनेचा लाभ मिळवण्यासाठी सर्वात महत्त्वाची कागदपत्रांची अट कोणती आहे?**

उत्तर: आधार प्रमाणीकरण करणे आणि 'ॲग्रीस्टॅक' (Agristack) या सरकारी प्रणालीवर तुमची नोंदणी असणे अनिवार्य आहे.

**१४. जर माझी ॲग्रीस्टॅकमध्ये (Agristack) नोंदणी नसेल तर माझे कर्ज माफ होणार नाही का?**

उत्तर: असे होणार नाही. ॲग्रीस्टॅकमध्ये नाव नसल्यामुळे कोणताही शेतकरी वंचित राहणार नाही. प्रथम तुमची नोंदणी करून घेतली जाईल आणि मगच लाभ दिला जाईल, यासाठी विशेष मोहीम राबवली जाणार आहे.

**१५. कोणत्या बँकांकडून घेतलेले कर्ज या योजनेत माफ होईल?**

उत्तर: राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका, ग्रामीण बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि गावाकडच्या प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था (सोसायट्या) यांच्याकडून घेतलेले कर्ज माफ होईल.

**१६. मी आधी नियमित कर्ज भरले आणि आता थकीत सुद्धा आहे, मला कर्जमाफी आणि प्रोत्साहन असे दोन्ही लाभ मिळतील का?**

उत्तर: नाही. नियमानुसार, ज्या शेतकऱ्याला कर्जमुक्तीचा (२ लाखांपर्यंतचा) लाभ मिळेल, त्याला ५० हजारांचा प्रोत्साहनपर लाभ दिला जाणार नाही (वैयक्तिक शेतकरी हा निकष आहे).

**१७. या योजनेतून कोणाला वगळण्यात आले आहे? (कोण अपात्र आहे?)**

उत्तर: आजी-माजी मंत्री, खासदार, आमदार, जिल्हा परिषद/ पंचायत समिती/नगरपालिकेचे सदस्य. तसेच २५ हजारांपेक्षा जास्त पगार किंवा पेन्शन घेणारे सरकारी व निमसरकारी कर्मचारी आणि शेतीव्यतिरिक्त उत्पन्नावर इन्कम टॅक्स (आयकर) भरणारे लोक या योजनेस अपात्र आहेत.

**१८. मी सहकारी साखर कारखान्यात हंगामी कामगार म्हणून काम करतो, मला या योजनेचा लाभ मिळेल का?**

उत्तर: होय, नक्की मिळेल. साखर कारखान्याचे संचालक/ अधिकारी अपात्र असले तरी, 'हंगामी कामगारांना' या अपात्रतेतून वगळण्यात आले आहे, त्यामुळे तुम्हाला लाभ मिळेल.

**१९. माझे नाव पात्र शेतकऱ्यांच्या यादीत आहे की नाही, हे मला कुठे पाहायला मिळेल?**

उत्तर: शासनाकडून पात्र लाभार्थ्यांना एक विशेष युनिक क्रमांक दिला जाईल. ही यादी तुमच्या ग्रामपंचायत कार्यालयात, तलाठी कार्यालयात तसेच शासनाच्या ऑनलाईन पोर्टलवर प्रसिद्ध केली जाईल.

**२०. कर्जमाफीचे किंवा प्रोत्साहनपर लाभाचे पैसे माझ्या हातात मिळतील की खात्यात येतील?**

उत्तर: पैशांचे वाटप थेट तुमच्या संबंधित बँक कर्जखात्यात (DBT द्वारे) शासनाकडून जमा केले जाईल. जुलैच्या पहिल्या आठवड्यापासून पैसे जमा करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे जेणेकरून तुम्हाला नवीन पीक कर्ज काढता येईल.

**२१. या योजनेचा फायदा राज्यातील किती शेतकऱ्यांना होणार आहे आणि यासाठी शासनाने किती निधी दिला आहे?**

उत्तर: या योजनेचा लाभ राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकरी बांधवांना मिळणार आहे. शेतकऱ्यांची कर्जाच्या ओझ्यातून मुक्तता करण्यासाठी शासनाने तब्बल ३६ हजार ५०० कोटी रुपयांचा मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे.

**२२. या कर्जमुक्ती योजनेला 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' यांचे नाव का देण्यात आले आहे?**

उत्तर: यंदा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी (३०० वे) जयंती वर्ष आहे. त्यांनी शेती, सिंचन आणि ग्रामीण विकासासाठी केलेले काम आजही आदर्श आणि प्रेरणादायी मानले जाते. त्यांच्या या थोर कार्याला अभिवादन करण्यासाठी शासनाने या योजनेला त्यांचे नाव दिले आहे.

**२३. जर माझे कर्ज राष्ट्रीयकृत किंवा खाजगी बँकेत 'बुडीत' (NPA) म्हणून घोषित झाले असेल, तर मला एकवेळ समझोता (OTS) मध्ये काही सवलत मिळेल का?**

उत्तर: होय. राष्ट्रीयकृत, खाजगी आणि ग्रामीण बँकांकडील जे पीक कर्ज बुडीत (NPA) खात्यात गेले आहे, त्यात तुम्हाला सवलत मिळवून देण्यासाठी शासनाने अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती नेमली आहे. ही समिती बँकांशी वाटाघाटी करून तुम्हाला कर्जात किती टक्के सूट द्यायची हे ठरवेल.

**२४. कर्जमाफीच्या यादीत माझे नाव नसेल किंवा माझ्या कर्जाच्या रक्कमेबाबत माझी काही तक्रार असेल, तर मी कुठे दाद मागावी?**

उत्तर: तुमच्या कोणत्याही तक्रारींचे निवारण करण्यासाठी शासनाने प्रत्येक जिल्ह्यात 'जिल्हाधिकारी' यांच्या अध्यक्षतेखाली एक जिल्हास्तरीय समिती स्थापन केली आहे. यादीत नाव नसणे, आधार लिंक नसणे किंवा कर्जाच्या रक्कमेबाबत काही अडचणी असतील तर त्या सोडवण्याची जबाबदारी या समितीवर सोपवण्यात आली आहे.

**२५. वारंवार कर्जमाफीची वेळ येऊ नये आणि शेतकरी कायमचा कर्जमुक्त व्हावा यासाठी सरकारचा काही वेगळा विचार आहे का?**

उत्तर: होय. शेतकरी पुन्हा कर्जाच्या दुष्टचक्रात अडकू नये आणि त्याच्या उत्पन्नात कायमस्वरूपी स्थैर्य निर्माण व्हावे यासाठी शासनाने एक समिती नेमली होती. या समितीने सुचवलेल्या 'दीर्घकालीन उपाययोजनांची' शासनाकडून टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी केली जाणार आहे.

**संकलन – जिल्हा माहिती कार्यालय, सांगली**

# जामखेड मिलिंद नगर येथे सांडपाण्यासह गटारींचे पाणी रस्त्यावर; परिसरातील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात

**दैनिक युवक आधार जामखेड प्रतिनिधी बापुसाहेब घोडेस्वार** : जामखेड शहरातील मिलिंद नगर परिसरातील गटारींचे पाणी तसेच सांडपाण्याचा निचरा व्यवस्थित होत नाही. गटारीचे पाणी रस्त्यावरून वाहत असल्याने परिसरात दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे परिसरातील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले असून त्यांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

मिलिंद नगर प्रभाग क्रमांक सहा परिसरातील गटारीचे तसेच सांडपाण्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. नगरपरिषद व नगरसेवकांचे या बाबींकडे दुर्लक्ष होतांना दिसत आहे. तातडीने उपाय योजना करावी

नगराध्यक्ष व नगरपरिषद प्रशासनाला सामाजिक कार्यकर्ते संदेश घायतडक यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांनी निवेदनातून तीव्र आंदोलनाचा ईशाला देण्यात आला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, मिलिंद नगर मधील कांबळे किराणा ते संजय वाघमारे या दरम्यान अंडरग्राऊंडर गटार / नालीमध्ये सांडपाणी तुंबले आहे त्यामुळे दुर्गंधी पसरली आहे तसेच डासांची वाढ होत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये थंडी ताप मलेरिया, डेंगू सारखे रोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सांडपाण्याची विल्हेवाट लावण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.



**नगरपरिषद प्रशासनाने तात्काळ पाहणी करून पावसाचे दिवस असल्याने गटारीचे पाणी व सांडपाण्याची विल्हेवाट लावावी अन्यथा नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल. - सामाजिक कार्यकर्ते संदेश घायतडक.**

मिलिंद नगर परिसरात छोटे लहान बालक मुलांची संख्या जास्त असून सदर लहान मुले रस्त्यावर खेळत असतात या परिसरात दुर्गंधी तसेच सांडपाण्याची दुरावस्था झाली असून पाणी हे रस्त्यावर येत आहे. मिलिंद नगर परिसरात नगरपरिषदचे दुर्लक्ष असून सफाई कामगार व गटार साफ होत नाही.

निवेदनावर सामाजिक कार्यकर्ते संदेश घायतडक, कांताबाई अंकुश गायकवाड, दीपाली अनिल वाघमारे, संजय राजाराम भोसले, संतोष लक्ष्मण डाडर, उमेश गायकवाड, संजय वाघमारे, पूनम अशोक कांबळे, राधा जाधव, मयूर जाधव, नितीन राऊत, सरस्वती गायकवाड, अक्षय गायकवाड, राजेंद्र गायकवाड, कृष्णा साळवे आदी नागरिकांच्या सह्या आहेत

# पावसाळ्यात मुलांची रोगप्रतिकारशक्ती कशी वाढवाल?

पावसाळ्यात बदलत्या हवामानामुळे मुलांची रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होते आणि ते सहज विषाणूजन्य आजारांना बळी पडतात. अशा वेळी मुलांचे आरोग्य जपण्यासाठी आणि त्यांची प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी पालकांनी त्यांच्या आहाराकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. आज आपण जाणून घेऊया पावसाळ्याच्या दिवसांत मुलांची 'इम्युनिटी' वाढवण्यासाठी त्यांच्या आहारात कोणत्या पौष्टिक पदार्थांचा समावेश करावा

मुलांना आहारात हंगामी फळे, पालेभाज्या, अंडी, कडधान्ये द्यावेत. यामुळे त्यांच्या शरीराला लोह, झिंक आणि आवश्यक व्हिटामिन्स मिळतील.

लिंबू, संत्री, पेरू आणि आवळा नक्की खायला द्या. या आंबट फळांमध्ये भरपूर प्रमाणात व्हिटामिन सी असते.



व्हिटामिन सी युक्त फळांमुळे रोगप्रतिकारकशक्ती वाढते.

हिरव्या पालेभाज्या मुलांना नक्की द्या. तुम्ही मेथी, पालक आदी भाज्या देऊ शकता. या भाज्यांमध्ये फॉलिक ॲसिड आणि लोह मुबलक प्रमाणात असते.

तसेच व्हिटामिन ए, व्हिटामिन सी सुद्धा असते, ज्यामुळे मुलांची रोगप्रतिकार क्षमता वाढण्यास मदत होते.

लहान मुलांना मासे खाऊ घातले तर त्यांच्या शरीरातील ओमेगा 3 फॅटी ॲसिडची गरज सहजतेने भरून निघेल आणि त्यांची रोगप्रतिकारक शक्ती वाढेल.

सुका मेवा आणि बियामध्ये झिंक, लोह, व्हिटॅमिन ई, ओमेगा 3 फॅटी ॲसिड्स आदी भरपूर प्रमाणात असते, ज्यामुळे रोगप्रतिकार क्षमता वाढण्यास मदत होते.

मुलांना नारळ पाणी देऊ शकता, यामुळं सुद्धा लहान मुलांची रोगप्रतिकार क्षमता वाढण्यास मदत होईल.